बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ०५ | बुधवार, दि.१० जानेवारी २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

## अखेर तो दिवस आला! निकाल काय लागणार याकडे सर्वांचे लक्ष!

**मुंबई :** गेल्या दीड वर्षापासून महाराष्ट्राचे राजकारण ढवळून काढणाऱ्या शिवसेनेतील पक्षफुटीवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर उद्या अंतिम निर्णय देणार आहेत. एकनाथ शिंदे यांनी पक्षात बंड करत काही आमदारांना सोबत घेऊन महाराष्ट्रात केलेल्या जादूमुळे आजवर ठाकरे गटाच्या अनेक बड्या बड्या नेत्यांनी ठाकरेंची साथ सोडत एकनाथ शिंदेंचे नेतृत्व पत्करले. त्यानंतर या दोन्ही गटातील वाद विकोपाला गेले आणि शिवसेना नेमकी कोणाची हा प्रश्न निर्माण झाला. या ऐतिहासिक राजकीय पेचावर बुधवारी, १० जानेवारी रोजी सायंकाळी चार वाजता निकाल दिला जाणार आहे.

सर्वोच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान, अपात्र आमदार प्रकरणाचा निर्णय न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांकडे सोपविला होता. दि. ११ मे रोजी एकनाथ शिंदे गटाच्या १६ बंडखोर आमदारांच्या अपात्रतेबाबत निर्णय देण्यात आला होता.



न्यायालयाने बंडखोर आमदारांच्या सदस्यत्वाचा निर्णय विधानसभा अध्यक्षांवर सोपवण्यात आला होता. उद्धव ठाकरे गटाचे नेते सुनील प्रभू यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करुन या प्रकरणाचा फेरविचार करण्याचे आवाहन केले होते. विधानसभा अध्यक्ष हे प्रकरण जाणून-बुजून पुढे ढकलत असल्याचा युक्तिवाद त्यांनी याचिकेत केला होता.

शिवसेना आमदार अपात्रतेसंदर्भात दोन्ही गटांच्या याचिकांवर १४ सप्टेंबर ते २० डिसेंबरपर्यंत विधानसभेच्या अध्यक्षांसमोर मॅरेथॉन सुनावणी झाली. त्यानंतर सुमारे ५०० पानांचे निकालपत्र तयार करण्याचे काम सध्या सुरु आहे. विधानसभा अध्यक्ष विधानभवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये या निकालाचे वाचन करणार आहेत. मागील सुमारे दीड वर्षांपासून अत्यंत चर्चेच्या आणि राजकीय वादाच्या ठरलेल्या या मुद्द्यावरील निकालाकडे संपूर्ण राज्याचे आणि देशाचेही लक्ष लागले आहे.

आमदार अपात्रतेवर सर्वोच्च न्यायालयात तब्बल १० महिने झालेल्या सुनावणीनंतर १४ मे २०२३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने निकाल देत, पक्ष कोणाचा ते ठरविण्याची तसेच आमदार पात्रता ठरविण्याची जबाबदारी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर सोपविली. यानंतर निकालासाठी तारखांमध्ये दोनदा मुदतवाढ करण्यात आली आणि अखेरीस १० जानेवारी ही तारीख देण्यात आली. त्यानुसार आता उद्या हा निकाल लागणार आहे.

### काहीही झालं तरी प्रकरण सुप्रीम कोर्टात जाऊ शकतं

**तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, कोणताही स्पष्ट निकाल न देता सर्वोच्च न्यायालयाकडे प्रकरण वर्ग करण्याचा पर्याय अध्यक्षांकडे नाही. त्यांना एक निकाल द्यावा लागेल. अध्यक्षांनी कोणत्याही बाजूने निकाल दिला तरी ते प्रकरण पुन्हा सर्वोच्च न्यायालयाकडे जाणारच आहे. कारण एक गट नाराज होणारच आहे आणि तो सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेणार आहे. यातला मधला मार्ग काढणे अपेक्षित नाही. त्यांना पात्र किंवा अपात्र ठरवावे लागेल. त्यामुळे आता अध्यक्ष काय निकाल देतात याकडे सर्वांच्या नजरा आहेत.**

## शुल्क तर घेतले, आता सुविधाही पुरवा

### भावी डॉक्टरांनी केले आंदोलन: अभ्यास कुठे करायचा असा केला सवाल



**गोंदिया:** प्रवेश घेताना ग्रंथाल व जिमच्या नावावर १५०० रुपये अतिरिक्त शुल्क घेण्यात आले. मात्र त्यांचा पत्ताच नाही. एकाच खोलीत कित्येक विद्यार्थ्यांना कोंबले गेले आहे. अशात आम्ही अभ्यास कोठे करायचा, असा सवाल करीत येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सोमवारी (दि.८) आपल्या वर्गातच बसून आंदोलन केले. मात्र त्याची काहीच दखल घेण्यात आली नसल्याने त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वैद्यकीय महविद्यालयात प्रवेश घेताना विद्यार्थ्यांकडून ग्रंथालय आणि जिमसाठी १५०० रुपये अतिरिक्त शुल्क आकारण्यात आले होते. मात्र दोन्ही सुविधा महाविद्यालयाचे पुरविल्या नाही.

वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहातील एका खोलीत १० वर विद्यार्थी राहत असल्याने विद्यार्थ्यांना चक्क खाली झोपावे लागत आहे. वैद्यकीय महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत नसल्याने तिन्ही वर्षातील विद्यार्थ्यांना एकाच वर्गखोलीत बसून शिकावे लागल्याने उद्याचे भविष्य असणारे डॉक्टर कसे घडतील? असा प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केला आहे. यातूनच सोमवारी (दि.८) विद्यार्थ्यांनी आपल्या वर्गखोलीत बसून आंदोलन केले. त्यांच्या आंदोलनाची दखल अधिष्ठातांनी घेतली नाही. यामुळे विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन आपल्या समस्या मांडल्या. मात्र, परीक्षा तोंडावर आल्या आहेत. त्यामुळे आता परीक्षेसाठी अभ्यास कुठे करायचा असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडला आहे.

## महावितरणची नव्या वर्षाची भेट; नवीन वीजजोडणी तात्काळ उपलब्ध होणार

### नवीन सेवा जोडणी (NSC) योजनेमध्ये पायाभूत वीजयंत्रणा उभारण्याचा खर्च महावितरण करणार

**मुंबई:-** कृषिपंप वगळून उर्वरित सर्व वर्गवारीतील ग्राहकांना तात्काळ नवीन वीजजोडणी किंवा वीजभार वाढवून देण्यासाठी आवश्यक पायाभूत वीजयंत्रणा उभारण्याचे काम महावितरणकडून करण्यात येत आहे. त्यामुळे वीजग्राहकांना तात्काळ नवीन वीजजोडणी उपलब्ध होणार आहे. त्यासाठी नवीन वीजजोडणीसाठी नवीन सेवा जोडणी (NSC) योजनेचा पर्याय ग्राहकांना सर्वप्रथम देण्यात यावा तसेच कृती मानकांप्रमाणे निश्चित केलेल्या कालावधीत सेवा देण्यात यावी असे सक्त निर्देश महावितरणकडून क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहे.

कृषिपंप वगळून नवीन वीजजोडण्या देण्यासाठी नवीन सेवा जोडणी (New Service Connection - NSC), नॉन डीडीएफ ग्राहक योगदान व परतावा (Non DDF Consumer Contribution & Refund - CC&RF) तसेच समर्पित वितरण सुविधा (Dedicated Distribution Facility - DDF) अशा तीन योजना अस्तित्वात आहेत. यामध्ये वीजग्राहकांना नवीन वीजजोडणी देण्यासाठी नवीन सेवा जोडणी (NSC) योजना अतिशय महत्वाची आहे. या योजने अंतर्गत नवीन वीजजोडणी देणे किंवा वीज भार कमी अधिक करण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर आवश्यक पायाभूत सुविधांची व यंत्रणेची कामे महावितरणकडून करण्यात येतील. त्यासाठी ग्राहकास कोणताही खर्च करावा लागणार नाही. तर केवळ सेवा जोडणी शुल्क व सुरक्षा ठेव रक्कम भरावी लागेल.




मात्र राज्यात काही ठिकाणी नवीन सेवा जोडणीच्या पर्यायाची माहिती ग्राहकांना देण्यात येत नसल्याचे प्रकार समोर आले आहेत. त्याची महावितरणने गंभीर दखल घेत नुकतेच एक परिपत्रक जारी केले आहे. त्यामध्ये नवीन वीजजोडणीसाठी नवीन सेवा जोडणी (NSC) योजनेचा ग्राहकांना सर्वप्रथम पर्याय देण्यात यावा असे सक्त निर्देश देण्यात आले आहे. तसेच या पायाभूत वीजयंत्रणेची कामे करण्यासाठी निधीची कोणतीही कमतरता नाही. क्षेत्रीय कार्यालयांनी वीजखांब, वितरण रोहीत्र, स्विच गिअर्स, वीजवाहिन्यांसह आवश्यक साधनसामग्री आपापल्या कार्यक्षेत्रात उपलब्ध ठेवावी तसेच ग्राहकांना तात्काळ नवीन वीजजोडणी उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देण्यात आले आहेत. या योजनेमध्ये वीज भार वाढवण्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधांची कामे सुद्धा अंतर्भूत करण्यात आली आहेत.

यासोबतच नॉन डीडीएफ ग्राहक योगदान व परतावा (CC&RF) योजनेमध्ये अर्जदार ग्राहक स्वतःच्या खर्चाने परवानाधारक विद्युत कंत्राटदाराकडून महावितरणच्या अंदाजपत्रकाप्रमाणे व देखरेखीखाली आवश्यक पायाभूत वीज यंत्रणा उभारण्याचे काम करतात. या खर्चाचा परतावा संबंधित वैयक्तिक अर्जदाराला किंवा ग्राहकांच्या गटाला मासिक वीजबिलांमध्ये समायोजित केला जातो.

नवीन वीजजोडणीच्या तिसऱ्या समर्पित वितरण सुविधा (DDF) योजनेमध्ये प्रामुख्याने बांधकाम व्यावसायिकांनी किंवा अर्जदार ग्राहकांनी स्वतःच्या खर्चाने परवानाधारक विद्युत कंत्राटदारांद्वारे स्वतंत्र वीजवाहिन्या, वितरण रोहित्र, उपकेंद्र, क्षमतावाढ आदी पायाभूत वीजयंत्रणा उभारण्याचे काम केल्यास या वीजयंत्रणेची सुविधा संबंधित ग्राहकांसाठी समर्पित राहते. मात्र ही वीजयंत्रणा महावितरणकडे हस्तांतरित केली जाते आणि देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी महावितरणकडे कायम राहते.

सद्यस्थितीत या तिन्ही योजनांद्वारे महावितरणकडून नवीन वीजजोडणी देण्याची अंमलबजावणी सुरू आहे. मात्र राज्यात काही ठिकाणी महावितरण अधिकाऱ्यांकडून फक्त समर्पित वितरण सुविधा (DDF) योजनेचा पर्याय देण्यात येत असल्याचे निर्दशनास आले आहे. महावितरणाच्या धोरणानुसार यापुढे नवीन वीजजोडण्यांचे अर्ज तसेच भार वाढवणे/कमी करण्याचे अर्ज नवीन सेवा जोडणी (NSC) किंवा नॉन डीडीएफ ग्राहक योगदान व परतावा (CC&RF) योजनेमध्ये स्वीकारले जातील. या दोन्ही योजनांऐवजी समर्पित वितरण सुविधा (DDF) योजनेचा पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांकडून तसा लेखी अर्ज घेऊनच त्यामध्ये कामे करण्याचे निर्देश महावितरणने क्षेत्रीय कार्यालयांना दिले आहे.

## विदर्भातील पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी टुरिझम सर्कीट विकसीत करा-उपमुख्यमंत्री अजीत पवार

**मुंबई :-** प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताची अर्थव्यवस्था जगातल्या "टॉप-५' वर पोहोचली आहे. येत्या काळात देशाची अर्थव्यवस्था "पाच ट्रिलियन' डॉलर करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे उद्दीष्ट आहे. हे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्राने "एक ट्रीलियन' डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने आपले प्रयत्न सुरु असून प्रत्येक जिल्ह्यांनी आपल्या जिल्ह्यात खासगी गुंतवणुक आकर्षित करणे, निर्यात वाढविणे तसेच राज्यासह केंद्राच्या योजनांचा अभिसरणाद्वारे अधिकाधिक निधीचा वापर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिले. विदर्भात पर्यटन विकासाला अमर्याद संधी आहेत, विदर्भातील पर्यटनाला चालना देण्यासाठी नागपूरसह अमरावती विभागातील महत्वाच्या पर्यटन क्षेत्रांची एकत्रित सांगड घालून टुरिझम सर्किट विकसीत करण्याच्या सूचना त्यांनी आज दिल्या.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक योजनेची (सर्वसाधारण) राज्यस्तरीय बैठक मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी विदर्भातील नागपूर व अमरावती विभागातील अकरा? जिल्ह्यांचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला. या बैठकीला व्हिसीद्वारे चंद्रपूर व वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, अमरावतीचे पालकमंत्री चंद्रकात पाटील, अकोल्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, बुलडाण्याचे पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील (प्रत्यक्ष उपस्थित), गोंदियाचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम, भंडाऱ्याचे पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावीत, यवतमाळ व वाशीम जिल्ह्यांचे पालकमंत्री संजय राठोड (प्रत्यक्ष उपस्थित), भंडाऱ्याचे जिल्हा परिषद अध्यक्ष गंगाधर जिभकाटे, गोंदीयाचे जि. प. अध्यक्ष पंकज रहांगडाले, अकोल्याच्या जि. प. अध्यक्षा संगीता अडाऊ, वाशीमचे जि.प.अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांच्यासह नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय (प्रत्यक्ष उपस्थित), नागपूरचे पालकसचिव असीम गुप्ता (प्रत्यक्ष उपस्थित), वर्धा जिल्ह्याचे पालक सचिव डॉ. अनुपकुमार यादव, नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, अमरावतीच्या विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय, नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. बिपीन इटनकर, वर्ध्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, भंडाऱ्याचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, गोंदियाचे जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, चंद्रपूरचे प्रभारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, गडचिरोलीचे जिल्हाधिकारी संजय मीणा, अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटीयार, अकोल्याचे जिल्हाधिकारी अजित कुमार, यवतमाळचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, बुलडाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, वाशिमच्या जिल्हाधिकारी बुवनेश्वरी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, संबंधित लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला जिल्हा वार्षिक योजनांमधील निधी खर्चाचे प्रमाण अल्प राहून त्यामध्ये वर्षाच्या अखेरीस मोठ्या प्रमाणावर वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यांनी वित्त विभागाने निधी वितरीत केल्यानुसार निधी खर्चाचे प्रमाण राहील याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी. निधी वेळच्यावेळी खर्च करतानाच विकासकामे दर्जेदार पध्दतीने पूर्ण करावीत.





### केंद्राच्या महत्वाकांक्षी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी साहेबांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र सरकारच्या अनेक महत्वाकांक्षी योजना सुरु आहेत. या योजना निती आयोगाच्या माध्यमातून सनियंत्रित करण्यात येत आहेत. या योजनांमध्ये प्रधानमंत्री पोषण अभियान, प्रधानमंत्री स्कूल रायझिंग इंडिया, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, प्रधानमंत्री स्वनिधी योजना, अमृत योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, जल जीवन मिशन, हर घर जल, ट्रॅव्हल फॉर लाईफ, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आदींचा समावेश आहे. या केंद्राच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.**

### विदर्भात टुरिझम सर्किट उभारा

**विदर्भात पर्यटनाच्या अमर्याद संधी आहेत. सर्वाधिक व्याघ्र प्रकल्प नागपूर विभागात आहेत. व्याघ्र प्रकल्पाच्या सफारीसाठी पर्यटक मोठ्या संख्येने विदर्भात येत असतात. त्यांना अधिकच्या सुविधा देतानाच, या सर्व पर्यटनकेंद्रांना जोडून टुरिझम सर्किट उभारण्यात यावे. यवतमाळच्या टिपेश्वर अभयारण्य, मेळघाट यांसारख्या पर्यटन क्षेत्रांना अधिकची सुविधा देण्याबरोबरच त्यांची अधिक प्रभावीपणे प्रचार आणि प्रसिध्दी करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.**

### "डिपीसी'च्या माध्यमातून गत वेळपेक्षा वाढीव निधी

**जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक जिल्ह्यांनी विविध यंत्राणांकडून आलेल्या मागणीनुसार निधीची मागणी केली आहे. जिल्ह्यांची लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्रावर आधारीत तयार करण्यात आलेल्या सूत्रानुसार निधीचे वितरण करण्यात येईल. तथापि गतवर्षी जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून देण्यात आलेल्या निधीपेक्षा यंदा अधिकचा निधी देण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.**

### विकासकामांच्या गुणवत्तेत तडजोड नको

**राज्य सरकार जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यांना देत असलेला निधी हा सर्वसामान्यांच्या कराच्या पैशातून देण्यात येतो. त्यामुळे या निधीचा विनियोग योग्य पध्दतीने झाला पाहिजे. जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या कामांच्या गुणवत्तेत कोणत्याही प्रकारची तडजोड करु नये, प्रत्येक काम गुणवत्तापूर्ण झाले पाहिजे, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.**

## भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातून डॉ.फुके भाजपचे उमेदवार!

**गोंदिया:-** येत्या वर्षात एप्रिल महिन्यात होऊ घातलेल्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात इच्छुक उमेदवारांनी आपल्या प्रचार मोहिमेला वेग दिलेला आहे. यात आपली उमेदवारी वाचविण्यासाठी विद्यमान खासदारांचा सुरु असलेला आटापिटा आणि माजी विधानपरिषद सदस्य डॉ.परिणय फुके यांचा कार्यक्रमांचा झंझावात बघता विद्यमान खासदारंना मागच्यावेळी लागलेली लॉटरी यावेळी मागे पडली असून नागपूर जिल्हा निवासी माजी मंत्री डॉ.परिणय फुके यांचे नाव पार्लेमेंटरी बोर्डाने जवळपास निश्चित केल्याचे वृत्त समोर आले आहे.

गेल्या काही दिवसापासून दोन्ही जिल्ह्यातील राजकीय हालचालीकडे बघितल्यास अचानक डॉ.फुके हे सक्रिय झालेले आहेत. त्यामुळे लोकसभा निवडणुकीतील उमेदवारींच्या आशेने भाजपमध्ये परत गेलेले विजय शिवणकर यांना मात्र लोकसभा मतदारसंघाचा निवडणुक प्रमुख करुन त्यांच्या अपेक्षांना तिथेच पक्षाने गोठवले. तर विद्यमान खासदार सुनिल मेंढे यांना पक्षातूनच होत असलेला आंतरिक विरोध या सर्व बाबींकडे लक्ष दिल्यास मागच्या निवडणुकीत ऐनवेळेवर फुकेंना वगळून मेंढेना मिळालेली तिकीट यावेळी मात्र त्यांच्या पदरात पडल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. त्याअनुषंगानेच की काय ५ जानेवारीला त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मागील काही वर्षबघितल्यास यावर्षीसारखा उत्साह संपूर्ण लोकसभा मतदारसंघात दिसून येत नव्हतो,तो जल्लोषःउत्साहा हा त्यांच्या उमेदवारीचे संकेत देणारे मानले जात आहे.

नागपूर जिल्ह्यातील मूळचे रहिवासी असलेले डॉ.परिणय फुके यांचे भंडारा गोंदिया विधानपरिषद निवडणुकीच्या निमित्ताने आगमन झाले. आणि त्यांनी दोन्ही जिल्ह्यातील मातब्बर नेत्यांना मात देत आपल्या वैशिष्ट्यपुर्ण शैलीने इतर नेत्यांना चित करीत दोन्ही जिल्ह्याचा राजकारणातील दादा होण्याचा मान माजी खासदार महादेवराव शिवणकर यांच्यानंतर प्राप्त केला हे कबूल करायची वेळ आली आहे.



आधी भंडारा जिल्ह्यातील साकोली विधानसभा मतदारसंघापर्यंतच त्यांच्या कार्यक्रमाची रेलचेल होती, मात्र त्यानंतर शासनस्तरावरुन जिल्हा नियोजन समितीच्या विशेष निमत्रिंत सदस्याच्या यादीत दोन्ही जिल्ह्यातील स्थानिक नेत्यांच्या नावाना मागे ठेवत सर्वात आधी फुके यांचे नाव उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून आले होते. त्यानंतर दोन तीन महिन्यानी कुठे गोंदिया भंडारा जिल्ह्यातील माजी आमदारांना संधी मिळाली. यावरुन पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरुन त्यांना तसे निर्देश देण्यात आले असून फुके यांनी आपल्या परिचित व जवळच्या मित्रमंडळींनाही आपले नाव निश्चित झाल्याचा संदेश अनेक बैठकांच्या माध्यमातून दिला आहे. त्यातच दोन्ही जिल्ह्यात त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमाचे नियोजन व होर्डिंगबाजीवरुन त्यांनी लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात विद्यमान खासदार सुनिल मेंढे यांनी खूप मागे टाकल्याचे दिसून येत आहे. त्यातच आपली खासदारकीची तिकिट वाचविण्याकरीता खा.मेंढे यांनीही आत्ता राममंदिराच्या निमित्ताने मतदारसंघात यात्रा काढली असली तरी त्या यात्रेने ही त्यांचे पुनरागमन होईल अशी कुठेच चिन्ह दिसून येत नाही, भाजपचेच अनेक कार्यकर्त मेंढे नकोच असा सुर लावून बसलेत.

फुके हेच या मतदारसंघातील भाजप-सेना-पवार महायुतीचे उमेदवार राहणार असून पक्षाच्या कार्यकर्त्यांना त्यापध्दतीचे संदेश पोचते करण्यात आले आहेत. मात्र भाजपकडून अधिकृतरित्या नावाची घोषणा ही निवडणुकीच्या दरम्यानच करण्यात येणार असल्याने त्यावेळपर्यतच्या बदलत्या राजकारणात काय होईल हे सुध्दा नकी सांगता येणारे नसले तरी सध्याच्या घडीला डॉ.फुके हे १०० टक्के भाजपचे उमेदवार राहणार निश्चित झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार भाजपच्या पार्लेमेंटरी बोर्डाकडे महाराष्ट्र भाजपने डॉ.परिणय फुके, खासदार सुनिल मेंढे, तिरोड्याचे आमदार विजय रहागंडाले व माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय शिवणकर यांच्या नावाची शिफारस केल्याचे वृत्त आहे. त्यातच आमदार विजय रहागंडाले यांनी लोकसभेपेक्षा विधानसभा मतदारसंघावरच आपला हक्क कायम ठेवला आहे.

भंडारा-गोंदिया मतदारसंघ हा महायुतीमध्ये राष्ट्रवादी सतत लढत आल्याने प्रफुल पटेल सुध्दा निवडणुकीच्या ऐनवेळेवर रिंगणात उतरतात की काय अशी परिस्थिती निर्माण झाली तर त्यावेळी भाजप आपला उमेदवार मागे घेऊन पटेलांना समर्थन देऊ शकतो, असा सुध्दा राजकीय अंदाज असला तरी प्रफुल पटेल हे कमळाच्या चिन्हावर निवडणुक लढण्यास इच्छुक नसल्याचेही सुत्रांचे म्हणने आहे. त्यामुळे पटेलांचा नकार फुकेंकरीता होकार ठरणार आहे.

## ड्रॉपबॉक्समध्ये अडकले ५७७५ विद्यार्थी

### ओळख पटत नसल्याने पोर्टलमध्ये नोंदच नाही: शिक्षण विभागाची वाढली डोकेदुखी

**गोंदिया:** जे विद्यार्थी एका शाळेतून दुसऱ्या शाळेत दाखल झाले तसेच विशेषत: शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांचे समायोजन इतर शाळांमध्ये करण्यात आले. त्या सर्वांची नोंद पोर्टलवर होणे गरजेचे आहे. परंतु त्यांच्याकडे ओळखीचा पुरावा नसल्यामुळे पोर्टलमध्ये नोंद करुनही त्यांचे समायोजन पोर्टलमध्ये होत नाही, असे जिल्ह्यातील आठ पंचायत समित्यांत ५,७७५ विद्यार्थी असून ते ड्रॉपबॉक्समध्ये स्थिरावले आहेत. वरिष्ठांकडून वारंवार सुचना होत असूनही ते ड्रॉपबॉक्समधून बाहेर निघून पोर्टलवर इम्पोर्ट होत नसल्याने शिक्षण विभागाची डोकेदुखी वाढली आहे.

शाळेतील बोगस विद्यार्थ्यांचे प्रमाण शुन्यावर आणणे आणि शाळांमधील खऱ्या विद्यार्थ्यांची ओळख पटवून विद्यार्थ्यांच्या आधारे शासकीय सोयीसुविधा पुरविण्याची माहिती मिळावी, यासाठी सर्व विद्यार्थ्यांचे आधार अपडेट करण्याच्या सुचना करण्यात आल्या आहेत. सुरुवातीच्या काळात जिल्हा शिक्षण विभागाने आधार अपडेट करणयात भरावी घेतली. त्याची शासनस्तरावर नोंदही घेण्यात आली. तब्बल ९८ टक्के आधार अपडेट करण्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित विद्यार्थ्यांचेही आधारकार्ड अपडेट करण्याच्या सुचना वारंवार करण्यात येत आहे. जिल्हास्तरावर अद्यापही ५,७७५ विद्यार्थ्यांचे आधार अपडेट पूर्ण झाले नाही. त्यामुळे महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक परिषदेकडून जिल्हा परिषदेला वारंवार पत्राचार करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेचा शिक्षण विभागहील पंचायत समित्यांना उर्वरित ५,७७५ विद्यार्थ्यांची नोंद करण्याच्या सूचना करीत आहे. मात्र आठही पंचायत समित्यांतर्गत असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांची नोंद पोर्टलवर करण्याचा प्रयत्न केला जात असतानाही ते विद्यार्थी ड्रॉपबॉंक्समध्ये दिसत आहेत. राज्यस्तरावर झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्समध्येही सुचना देण्यात आली. परंतु प्रयत्न करुनही त्या विद्यार्थ्यांचे आधारकार्ड नसल्याने पोर्टलवर नोंदच घेतली जात नाही. अशा अवस्थेत आता करावे तरी काय? असा सवाल शिक्षण विभागासमोर उभा ठाकला आहे. केले तर होत नाही आणि नाही केले तर साहेबांची फटकार ऐकायची, अशी गत त्यांची झाली आहे.



### कोणत्या तालुक्यात किती विद्यार्थी

| तालुका | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| आमगाव | ३९५ |
| अर्जुनी मोरगाव | ५१० |
| देवरी | ४२५ |
| गोंदिया | २४१७ |
| गोरेगाव | ४५६ |
| सडक अर्जुनी | ४२९ |
| सालेकसा | ५३२ |
| तिरोडा | ६११ |
| एकुण | ५७७५ |

## संपादकीय

### हिट ॲण्ड रन कायद्याची आता कसोटी?

ज्या देशात कडक कायदे असतात, त्या देशातील जनता शिस्तप्रिय मानली जाते. त्यामुळे कायदा कडक असावा, या आग्रहाचा सूर सर्वसामान्य जनतेतून नेहमीच येत असतो. कडक कायदा केला तर त्याचे स्वागत केले जाते. उदा. बलात्काराच्या घटनेतील आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी. त्याचा खटला फास्ट ट्रक कोर्टात चालावा, अशी मागणीही जनतेतूनच आलेली आहे. मात्र, संसदेच्या माध्यमातून असा कडक कायदा केला गेला, त्यावेळी त्याचे समाजातील सर्व स्तरातून स्वागत केल्याचे पाहायला मिळाले. तसेच माणसाच्या जीवाचे मोल कमी करता येत नाही. तरीही अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या आपल्या देशात कमी नाही. ज्या वाहनाने अपघात होतो, त्या वाहनाचा चालक हा जखमीला उपचारासाठी मदत करण्याऐवजी पळून जातो. अशा घटनांना हिट ॲण्ड रन असे संबोधले जाते.

केंद्र सरकारने नुकत्यात पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनात “हिट ॲण्ड रन’ विधेयक संसदेत मंजूर केले. या विधेयकाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही मंजुरी दिली. त्यामुळे हिट ॲण्ड रन कायद्यात सुधारणा करण्यात आली आणि आता हा भारतीय न्यायिक संहितेअंतर्गत नवा कायदा बनला आहे. मात्र, या नव्या कायद्यात समाविष्ट करण्यात आलेल्या तरतुदींना देशभरातून ट्रकचालकांच्या संघटनांनी विरोध केल्याने २०२४ च्या नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी देशातील अनेक भागांत मालवाहतूक ठप्प झाल्याचे चित्र निर्माण झाले. जनतेने थर्टी फर्स्ट साजरा केला. नव्या वर्षाच्या निमित्ताने एकमेकांना शुभेच्छा देण्यात व्यस्त असताना, मोठे ट्रक आणि कंनेटर यांच्या काम बंद आंदोलनाची बातमी कानावर येऊन थडकली. पहिल्या दिवशी सर्वसामान्य जनतेच्या जनजीवनावर फारसा परिणाम जाणवला नाही. मात्र, हे आंदोलन तीन दिवस चालणार असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. मंगळवारी दुसऱ्या दिवशी पेट्रोल पंप, भाजी मार्फेटवर त्याचा परिणाम झालेला दिसला.

ज्या नव्या कायद्यामुळे देशभर चक्काजाम आंदोलन सुरू झाले आहे, तो कायदा नेमका काय आहे तो पाहू? आतापर्यंत या कायद्यानुसार अपघातात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास संबंधित वाहनाच्या चालकास दोन वर्षांच्या तुरुंगवासाची तरतूद करण्यात येत होती आणि जामीनही मिळत होता. बदलत्या नव्या नियमानुसार जर कोणी वाहनाला धडक दिली आणि चालक पोलीस प्रशासनाला न सांगता घटनास्थळावरुन पळून गेला, तर त्याला १० वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा आणि दंडही ठोठवला जाणार आहे. या कायद्याला चुकीचे ठरवत देशभरातून आंदोलन केले जात आहे. हिट ॲण्ड रन प्रकरणांमध्ये सरकारी आकडेवारीनुसार दरवर्षी ५० हजार लोकांचा रस्त्यावर मृत्यू होतो. त्याविषयी माहिती गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेतही दिली होती. नवीन कायद्यात सरकार हिट ॲण्ड रन प्रकरणांमध्ये कठोर तरतुदी करत आहे. या कायद्याअंतर्गत एखाद्या कारने एखाद्याला धडक दिली व अपघातग्रस्त व्यक्तीला मदत करण्याऐवजी चालकाने तिथेच टाकून पळ काढला, ती व्यक्ती मृत्युमुखी पडली तर त्या चालकाना १० वर्षांचा तुरुंगवास आणि ७ लाख दंड भरावा लागणार आहे. तर जे चालक अपघातग्रस्त व्यक्तीला रुग्णालयात घेऊन जातात किंवा अपघात झाल्यानंतर पोलिसांना अपघाताची माहिती देतात त्यांना मात्र त्यातून दिलासा मिळणार आहे.

आजपर्यंत याबाबतची आयपीसीमध्ये अशी तरतूद करण्यात आली नव्हती. नव्याने तयार करण्यात आलेल्या भारतीय न्याय संहितेच्या कलम १०४ मध्ये “हिट ॲण्ड रन’ कायद्याचा समावेश करण्यात आला आहे, असे गृहमंत्री शहा यांनी सांगितले. देशभरातील ट्रक, ट्रेलर, बस, सार्वजनिक वाहतूक आणि टॅक्सीचालक या कठोर तरतुदीला विरोध करत आहेत. उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये या नव्या कायद्याविरोधात निदर्शने होत असून महामार्ग रोखले जात आहेत. महाराष्ट्रातही अनेक जिल्ह्यांमधून या कायद्याला विरोध केला जात आहे. तसेच, या कायद्याविरोधात संपही पुकारण्यात आला आहे. नव्या कायद्यामुळे इकडे आड तिकडे विहीर अशी अवस्था वाहनचालकांची झाली आहे. कारण अपघातानंतर घटनास्थळावरून पळून गेल्यास १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होईल, असे या नव्या कायद्याला विरोध करणाऱ्या वाहनचालकांचे म्हणणे आहे. जर अशा वेळी ड्रायव्हर्स घटनास्थळी थांबले, तर जमाव त्यांच्यावर हल्ला करेल आणि त्यांना बेदम मारहाण होऊ शकते.

काही वेळा संतप्त जमाव हिंसक होऊन प्रकरण मॉब लिंचिंगचंही रुप घेऊ शकते, अशी भीती वाहनचालकांची व्यक्त केली आहे. ट्रक, टॅक्सी चालक हे फार शिक्षित नसतात. महिनाकाठी १० ते १८ हजारांच्या आसपास त्यांना पगार मिळतो. मात्र हिट ॲण्ड रन हा नवा कायदा जणू काही चालकांच्या मुळावर येणारा आहे, असा जलदगतीने प्रचार या चालकांपर्यंत एवढ्या कमी कालावधीत कसा पोहोचला, हाही संशोधनाचा विषय आहे. कारण या कायद्यातील दुसऱ्या तरतुदीवर कुणीही फोकस केलेला दिसला नाही. अपघात झाल्यानंतर पोलिसांना अपघाताची माहिती देणाऱ्या वाहन चालकांना हा कायदा लागू होणार नाही. मात्र, जणू काही अपघातानंतर चालकाला पळून जावे लागते, असे गृहीत धरुन आंदोलनाचा हेतू निर्माण करण्यात आला आहे. त्यामुळे मोदी-शहा यांच्या द्वेषापोटी या ट्रकचालकांना कोण भडकवत तर नाही ना, याचा विचार करण्याची गरज आहे. हिट ॲण्ड रन हा कायद्यातील सुधारणा संसदेत झाल्या असल्या तरी, त्याला होत असलेला विरोध हा रस्त्यावर आला आहे. त्यामुळे या आंदोलनाची झळ सर्वसामान्यांना लागू नये यासाठी जितक्या लवकर हे आंदोलन मागे घ्यावे यासाठी सरकारकडून प्रयत्न करणे ही सुद्धा हिट ॲण्ड रन कायद्याचीच आता कसोटी आहे.

# ११ वे अ.भा.मराठी शेतकरी साहित्य संमेलन नाशिक येथे

## ज्येष्ठ साहित्यिक भानू काळे संमेलनाध्यक्ष तर नाना पाटेकर करणार उदघाटन




नाशिक: कल्पनाविश्वात रमणाऱ्या आभासी शेतीसाहित्याची शेतीमधल्या प्रत्यक्ष उद्यमीतेच्या उत्क्रांतशील वास्तवाशी नाळ जोडण्यासाठी, सांप्रत शेती व्यवसायाला जखडणाऱ्या मानवनिर्मित बेड्यांची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या दाहक समस्यांची मराठी साहित्यविश्वाला जाणीव करुन देण्यासाठी, नवसाहित्यिकांना सशक्त व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासोबतच त्यांच्या शेतीअर्थशास्त्र, अनर्थशास्त्र व नवतंत्रज्ञानाविषयीच्या जाणिवा समृद्ध करण्यासाठी, मराठी साहित्य-सारस्वतांची कृषि उद्योगीजगतासोबत सांगड घालून त्यांना कर्तव्यपूर्तीसाठी प्रेरित करण्यासाठी आणि लेखणीच्या माध्यमातून शेतीची दुर्दशा थांबवून शेतकऱ्याच्या आयुष्यात सुखाचे व सन्मानाचे दिवस खेचून आणण्याइतपत शक्तिशाली सृजनशील साहित्यिकांची नवीन पिढी निर्माण करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न म्हणून सोमवार दि. ४ व मंगळवार दि. ५, मार्च २०२४ रोजी सह्याद्री फार्म्स परिसर, मोहाडी ता. दिंडोरी जि. नाशिक या कर्तव्यभूमीत दोन दिवशीय ११ वे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती अ.भा.मराठी शेतकरी साहित्य चळवळीचे संस्थापक अध्यक्ष गंगाधर मुटे यांनी दिली आहे.

शेती उद्योग क्षेत्रात भरीव कामगिरी करून शेतीउद्योगाला नवी दिशा देणाऱ्या मोहाडी (जि. नाशिक) येथील सह्याद्री फार्म्स परिसरात आयोजित संमेलनाचे संमेलनाध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक तथा समीक्षक भानू काळे भूषविणार असून नाम फाउंडेशनचे संस्थापक तथा आघाडीचे सिने कलावंत नाना पाटेकर संमेलनाचे उदघाटन करणार आहेत. ज्येष्ठ शेतकरी नेत्या सरोजताई काशीकर, ज्येष्ठ शेतकरी नेते ॲड वामनराव चटप विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. चे व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे स्वागताध्यक्षपदाची धुरा सांभाळणार असून कार्याध्यक्ष म्हणून गंगाधर मुटे यांची तर संयोजक म्हणून मुंबई हायकोर्टाचे जेष्ठ विधिज्ञ ॲड. सतीश बोरुळकर, यांची निवड करण्यात आली आहे. संमेलनाच्या आयोजनाकरिता विविध समित्यांचे गठन करण्यात आले असून आयोजन समितीमध्ये प्रमोद राजे भोसले, ज्ञानेश उगले, शंकरराव ढिकले, सोपान संधान, निवृत्ती कडलग, प्रा. डॉ. कुशल मुडे, दिलीप भोयर, रविंद्र दळवी, सारंग दरणे, गणेश मुटे यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

मागील काही वर्षापासून शेतकरी आत्महत्यांनी धारण केलेले विक्राळरुप, कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळ अशा अस्मानी संकटामुळे उत्पादनात येणारी प्रचंड घट, शेतमालाच्या पडत्या बाजारभावामुळे व वाढलेल्या उत्पादन खर्चामुळे डबघाईस आलेले शेतीचे अर्थशास्त्र, मागील पाच वर्षांपासून सततची नापिकी, कधी चक्रभुंगा तर कधी बोंडसड, कधी कपाशीवर बोंडअळी तर कधी तुरीवर मर रोग यामुळे शेतीतील उत्पन्नासोबतच उत्पादनही मोठ्या प्रमाणावर घटले आहे, विजेचे बिल देखील भरण्याची शेतकऱ्यांची ऐपत उरलेली नाही. अशा बिकट स्थितीतही “रोजचेच मढे, त्याला कोण रडे” अशा निर्विकारपणे शेतीव्यवसायाकडे बघण्याची शासकीय व प्रशासकीय यंत्रणेची मानसिकता तयार झाली आहे त्यामुळे प्रसारमाध्यमे वगळता अन्य कोणत्याही आघाडीवर याविषयीचा फ़ारसा उहापोह होतांना दिसत नाही. राजकीय आणि शासकीय आघाड्यावर शेतीला आधार देणाऱ्या उपाययोजना शोधण्याऐवजी सक्तीने व बळाचा वापर करुन वीजपुरवठा खंडित करण्याच्या भीमगर्जना केल्या जात आहेत.

समाजाचा आरसा समजल्या जाणाऱ्या साहित्यक्षेत्रात सुद्धा यापेक्षा वेगळी स्थिती नाही. शेतकऱ्याची मुले शिक्षण घेऊन अन्य व्यवसायात गेली, पोटापाण्याचा प्रश्न सुटल्याने लिहिती होऊन अभिव्यक्त व्हायला लागली पण त्यांनाही शेतीच्या वास्तवाकडे अभ्यासपूर्ण आपुलकीने पाहावेसे वाटत नाही, हे शेतीव्यावसायाचे फार मोठे शल्य आहे. गेल्या १५-२० वर्षांमध्ये देशात लक्षावधी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत; पण त्याचे प्रतिबिंब साहित्यात प्रभावीपणे उमटलेले नाही. शेतीच्या वास्तवतेवर सर्वकष प्रकाश टाकणारे, खोलवर अभ्यासपूर्ण मांडणी करुन शेतीच्या दुर्दशेच्या कारणांचा शोध घेणारे, शेतीतील गरिबीचे, ग्रामीण भारतातील दुर्दशेचे खरेखुरे कारण सांगणारे आणि तशी अभ्यासपूर्ण मांडणी करुन योग्य मूल्यमापन करणारे आणि त्यावर आवश्यक उपाययोजनांची चाचपणी करुन जाणिवा समृद्ध करणारे पुस्तक मराठी साहित्यविश्वात आजही उपलब्ध नसणे ही बाब मराठी साहित्यक्षेत्राचे खुजेपण दर्शविणारी आहे.

साहित्यक्षेत्रातील शेतीप्रधान साहित्याची उणीव भरुन काढण्यासाठी अ.भा. मराठी शेतकरी साहित्य चळवळ कार्यरत असून या प्रयत्नाचाच एक भाग म्हणून २०१५ मध्ये पहिले अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन वर्धा येथे, २०१६ मध्ये दुसरे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन नागपूर येथे, २०१७ मध्ये तिसरे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन गडचिरोली येथे, २०१८ मध्ये चवथे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन मुंबई येथे, २०१९ मध्ये ५ वे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन, पैठण (औरंगाबाद) येथे, २०२० मध्ये ६ वे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन, अलिबाग (रायगड) येथे तर कोरोना आपत्तीमुळे २०२१ साली ७ वे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन ऑनलाईन पद्धतीने, २०२२ मध्ये ८ वे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन रावेरी (यवतमाळ) येथे, सप्टेंबर २०२२ मध्ये ९ वे ऑनलाईन संमेलन आणि जानेवारी २०२३ मध्ये गुरुकुंज आश्रम (अमरावती) येथे आयोजित करुन पिढ्यानपिढ्याच्या अबोलतेला बोलते, लिहिते व वाचते करण्याच्या यशस्वी प्रयत्न करण्यात आला आहे. शेतकरी साहित्य चळवळीच्या प्रयत्नांना यश येऊन साहित्यिकांची नवीन पिढी अभ्यासपूर्ण वास्तवचित्र आक्रमक आणि सडेतोडपणे रेखाटायला लागली आहे.

११ व्या मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे स्वरुप आपापल्या कौशल्यगुणांचं, प्रतिभेचं प्रदर्शन मांडून वाहवा मिळवणाऱ्या हौश्या-गौश्या-नवश्यांचा जमाव यापुरतेच केवळ मर्यादित न राहता साहित्यिकांना कल्पनाविस्ताराठी बौद्धिक मेजवानी देणारे प्रशिक्षण शिबीर ठरावे आणि सशक्त लेखणीच्या माध्यमातून इंडियाच्या बरोबरीने भारतालाही समृद्ध व संपन्न करण्यासाठी हातात लेखणी घेऊन लढणाऱ्या लढवैया सृजनशील साहित्यिकांची नवीन पिढी निर्माण करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्याचा उद्देश या संमेलन आयोजनामागे आहे.

या संमेलनात उदघाटन सत्र, शेतकरी कवी संमेलन, शेतकरी गझल मुशायरा, परिसंवाद, कथाकथन असे विविधांगी सत्र असणार आहेत. या संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक, राजकीय नेते, ज्येष्ठ शेतकरी नेते, शेती अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक, अर्थतज्ज्ञ इत्यादी अनुभवी वक्ते भाग घेणार आहेत. तरी सर्व शेतीप्रेमी साहित्यिक आणि रसिकांनी जास्तीत जास्त संख्येने अग्रीम प्रतिनिधी नोंदणी करुन उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा-घनश्याम भुगावकर



**गोंदिया :** सर्वसामान्य नागरिकांना सुलभ व कालमर्यादेत विविध शासकीय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२००५ अस्तित्वात आला आहे. या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करुन नागरिकांना सुलभ व कालमर्यादेत ऑनलाईन सेवा उपलब्ध करुन द्यावे, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी घनश्याम भुगावकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात “महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२००५” ची प्रभावी अंमलबजवणी करण्याबाबत सर्व विभाग प्रमुखांकडून त्यांच्या विभागातील लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवांचा आढावा घेतला, त्यावेळी श्री. भुगावकर बोलत होते. पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, जिल्हा प्रकल्प प्रमुख राकेश हिवरे व जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक हरिचंद्र पौनीकर यांचेसह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

श्री. भुगावकर म्हणाले, लोकसेवा हक्क नियमांतर्गत नागरिकांची कामे जलदगतीने व कालमर्यादेत होण्यासाठी ऑनलाईन सेवेच्या माध्यमातून नागरिकांना सेवा उपलब्ध करुन द्याव्यात. ग्रामविकास विभागाने आदर्श आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करुन लोकसेवा हक्क कायद्याचा प्रचार व प्रसार करावा. कार्यालयांमार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व सेवांची यादी आणि माहिती कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावी. प्रत्येक विभागाने नागरिकांना ऑनलाईन सेवा उलब्ध करुन देवून प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावे असे त्यांनी यावेळी सांगितले.

शासनाने आपले सरकार वेबपोर्टल ३८ विभागाच्या ५२९ सेवा अधिसूचित केल्या असून ४१३ सेवांचा नागरिक ऑनलाईन लाभ घेवू शकतात. अधिसूचित सेवा नागरिकांना दिल्या जात आहेत किंवा नाही यासंदर्भात सुधारणा सूचविण्यासाठी सेवा हमी कायद्यान्वये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग गठीत करण्यात आलेला आहे. नागरिकांना विहित कालमर्यादेत सेवा न मिळाल्यास अथवा नियमोचित कारणाशिवाय ती नाकारल्यास अशा निर्णयाविरुध्द प्रथम व द्वितीय अपील सामान्य नागरिकांना आपले सरकार सेवा केंद्रातून आता करता येईल. तरीसुध्दा समाधान न झाल्यास महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाकडे तृतीय अपील करता येईल. तसेच कसुरदार अधिकाऱ्या प्रति प्रकरण ५ हजार रुपयांपर्यंत दंड होवू शकतो. अधिक माहितीसाठी aaplesarkar.mahaonline.gov.in व aaplesarkar.maharashtra.gov.in यावर भेट देवू शकता. अशी माहिती जिल्हा प्रकल्प प्रमुख राकेश हिवरे यांनी यावेळी दिली.

## बुकी सोंटू जैनला ३ दिवसांचा पीसीआर

गोंदिया: ऑनलाइन गेमिंग ॲपद्वारे कोट्यावधी रुपयांची फसवणूक करणारा आंतरराष्ट्रीय बुकी अनंत उर्फ सोंटू जैनच्या अडचणीत वाढ होत आहे. ६ जानेवारीला सट्टेबाज सोंटू जैन पुन्हा गोंदियात हजर झाला. सहयोगी दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, गोंदियातील सोंटू जैन यांना मोठा धक्का बसला असून तीन दिवस चौकशीसाठी गोंदिया पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली. गोंदियातील निरज मनकारी या युवकाच्या आत्महत्यामागे सोंटू जैन याचे धागेदोरे असल्याचे आता त्यादृष्टीने तपास सुरु झाला आहे.

ऑनलाइन बेटिंग रॅकेटमध्ये अडकलेल्या नीरज मानकानी (२४, रा.बाबाभवन, चंद्रशेखर वार्ड, श्रीनगर) या तरुणाला ऑनलाइन गेमच्या व्यासनामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले होते. नुकसानाला कंटाळून त्याने २८ जुलै २०२३ रोजी स्वत:च्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेनंतर आत्महत्येचा धक्का त्याच्या आईला सहन न झाल्याने मुलाला आत्महत्येक प्रवृत्त करणाऱ्या बुकींवर गुन्हा दाखल करण्याची विनंती केली. तसेच मृत मुलाच्या मोबाइल फोनही पोलिसांच्या ताब्यात दिला. मात्र या गुन्ह्यात पोलिसांनी आरोपी बनविलेले सोंटू जैनचा साथीदार चिराग फुंडे रा. सिव्हील लाईन्स आणि आरोपी अभिजित दोनोडे हे गुन्हा दाखल झाल्यापासून फरार आहेत. फरार आरोपींचा तात्पुरता जामीन अर्ज गोंदिया न्यायालयाने फेटाळल्यानंतर उच्च न्यायालयानेही अंतरिम जामीन अर्ज फेटाळला होता. सध्या त्यांचा जामीन अर्ज उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. दोन्ही आरोपी पोलिसांच्या तावडीतून सुटण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करीत अहेत. मात्र मृत निरज मानकारी यांच्या मोबाईलवरुन काही खास माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे दोन्ही फरार आरोपी आत्महत्या केलेल्या नीरज नामक व्यक्तीकडून जुगारात हरलेले पैसगे मिळावेत अशी मागणी सातत्याने करीत होते. या कॉन्फरन्सिंग संभाषणात सोंटूचे संभाषण (आवाज) आणि व्हॉट्सॲप चॅटही समोर आल्याचे सांगण्यात येत आहे. या आधारे गोंदिया पोलिसांनी नीरज मानकारी आत्महत्याप्रकरणी आंतरराष्ट्रीय बुकी सोंटू जैन याच्याविरुद्ध आणखी एक गुन्हा दाखल करुन या प्रकरणाचा तपास सुरु केला. त्याकरिता सोंटू जैनला नागपूर येथून ६ जानेवारीला गोंदिया जिल्हा व सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते.

## २६ भावी पोलिस पाटील लेखी,तोंडीतही नापास

**गोंदिया:** अर्जुनी मोरगाव उपविभागीय दंडाधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातील सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव तालुक्यातील गावांत एकूण ९५ पोलिस पाटील पदापैकी ६९ पदे पहिल्या टप्प्यात भरण्यात आली. उर्वरित २६ पदे भरण्यासाठी घेण्यात आलेल्या लेखी व तोंडी परीक्षेत उमेदवार उत्तीर्ण न झाल्याने ती पदे रिक्त आहेत. त्या २६ रिक्त पोलीस पाटील पदभरतीची प्रक्रिया सुरु करण्यात आली असून महसूल विभागाने वेळापत्रक जाहीर केले.




पोलीस पाटील म्हणजे गावस्तरावर शांतता आणि सुव्यवस्था राखण्यास मदत करणारा घटक आहे. अर्जुनी मोरगाव आणि सडक अर्जुनी तालुक्यातील ७५ पैकी ६९ पदे भरण्यात आली होती. २६ उमेदवार लेखी आणि तोंडी परीक्षेत नापास झाल्याने ही पदे रिक्त आहेत. अर्हताधारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे. परीक्षेचा अर्ज भरण्याचा कालावधी ५ ते २० जानेवारीपर्यंत राहील. खुल्या प्रवर्गासाठी ६०० तर आरक्षित आर्थिक दुर्बल घटकांसाठी ५०० रुपये परीक्षा शुल्क ठेवण्यात आले. परीक्षा फी अर्जासोबत ज्या संकेतस्थळावर अर्ज भरले, त्या ठिकाणातून परीक्षा शुल्क भरावे. भरती प्रक्रिया स्थगित करणे, रद्द करणे, बदल करणे, पदाचा आरक्षण प्रवर्गातील संख्येनुसार वाढ व घट करण्याच्या काही तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी राखून ठेवला असून त्यांचा निर्णय अंतिम राहील.

**या गावांसाठी होणार प्रक्रिया**

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील तिरखुरी येथे अनुसूचित जमाती महिला, जांभळी पोर्ला अनुसूचित जमाती, खडकी अनुसूचित जमाती, जुनेवाणी अनुसूचित जमाती, पांढरवाडी/रैयत इतर मागास महिला, धाबेटेकडी/पवनी इमाव महिला, मुंगली इमाव, खोकरी इमाव, बोडदे/कवठा इमाव महिला, गुढरी इमाव महिला, मांडोखालटोला इडब्ल्यूएस, कोरंभीटोला इडब्ल्यूएस, बोरटोला प.खुला महिला, केळवद खुला, आसोली खुला, सायगाव तुकूम खुला महिला, आंभोरा खुला महिला, सडक अर्जुनी तालुक्यातील बोळूंदा, अनुसूचित जमाती, धाडेझरी अनु. जमाती, बाम्हणी (खडकी) इमाव, कोसमघाट इमाव महिला, मंदीटोला इमाव महिला, खाडीपार इमाव महिला, मुंडीपार/सिंदीपार इमाव, वडेगाव इडब्ल्यूएस, कोहमारा खुला महिला.

## रुग्णांची सेवा ही ईश्वर सेवा आहे-राजकुमार बडोले

**सडक अर्जुनी:** रुग्णांची सेवा ईश्वर सेवा आहे. गोरगरीब जनता पैशांअभावी उपचार करु शकत नाही. त्यासाठी शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजना शेतकरील शेतमजुरांसाठी मोफत आहेत, याची जाणीव करुन दिली. त्या योजनांचा फायदा जनतेने घ्यावा, असे आवाहन माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी केले.



अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील नागरिकांसाठी माजी मंत्री राजकुमार बडोले व मित्रपरिवाराच्यावतीने नि:शुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन स्थानिक एच.अ‍ॅड.टी.कॉलेज येथे रविवारी करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते.

यावेळी पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, डॉ. अमृता चौधरी, डॉ. केशव नागपुरे, डॉ. नितीन शेरकर, डॉ. राजेंद्र जैन, डॉ. लोकेश मानकर, डॉ. नितीन शेरकर, डॉ. अमित कुमार बॉस, डॉ. अक्षय अंबिलकर, डॉ. नाकाडे, डॉ. विनिता यादव, डॉ. संजय गाडे, डॉ. अरविंद डोंगरवार, डॉ. तुरकर, डॉ. गुप्ता, डॉ. प्रभाकर गहाणे, डॉ. रोशन देशमुख, डॉ. हेमराज आरसोडे, डॉ. सतीश लंजे, डॉ. परमानंद कटाणे, डॉ. प्रवीण उजवणे, डॉ. कापगते, लक्ष्मीकांत धानगाये, विजय कापगते, शारदा बडोले, माजी जि.प. अध्यक्ष विजय शिवणकर, संगीता खोब्रागडे, उपसभापती शालिंदर कापगते, निशा तोडासे, रत्नदीप दहिवले उपस्थित होते. नागपूर, गोंदिया, तिरोडा येथून आलेल्या तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करुन उपचार केले. यात कॅन्सर, हृदयरोग, बालरोग, स्त्रीरोग, कान नाक घसा, नेत्र तपासणी, चर्मरोग, आर्थोपेडिक, मानसिक रोग, दंतरोग, ईसीजी तपासणी, शुगर तपासणी करण्यात आली.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# सत्यशोधक चित्रपट म्हणजे ब्राम्हणेतर चळवळीची नव्याने स्थापना

खरे तर छ. शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सुरू असणाऱ्या चळवळींना जसे सामाजिक व ऐतिहासिक वलय लाभले व त्यांनी या मापुरुषांचे विचार जीवंत ठेवण्यासाठी जी मेहनत घेतली, तेवढी मेहनत राष्ट्रपिता फुले यांच्या चळवळीला घेणारे कार्यकर्ते फारच दुर्मिळ प्रमाणात लाभले. पण फुलेंचे विचारच छ. शिवराय व डॉ आंबेडकर या महापुरुषांच्या चळवळीचा पाया होता हे आपण विसरता कामा नये. कारण छ.शिवरायांचा पहिला पोवाडा लिहिणारे व त्यांची समाधी शोधणारे जसे राष्ट्रपिता फुले होते तसेच डॉ आंबेडकरांच्या चळवळीचे गुरुही राष्ट्रपिता फुलेच होते. हे सारे सत्य असताना फुलेंना समाज का विसरला व त्यांनी फुले चळवळ फोफावून समाजाला शहाणे करण्याचा आणि ब्राम्हणी कचाट्यातून सोडवण्याचा प्रयत्न का नाही केला? याचे मोठे आश्चर्य वाटते.

पण राष्ट्रपिता फुले चळवळीचे एक विशेष असे वाटते की, हि चळवळ आंबेडकरी समाजाने जसे आपली केली, तसी ओबीसी समाजाने का केली नाही याचे विशेष वाटते. म्हणून म्हणावेसे वाटते की, “बा ज्योतिबा, तुझी नीती, गती आणि मती, बौद्धांना कळाली. पण ती तुझ्याच ओबीसींकडे का नाही वळाली?

रा. फुले चळवळीला बौद्धांनी जगाच्या वेशीपर्यंत नेले. एवढेच नाहीतर डॉ आंबेडकरांचे गुरू म्हणून फुलेंचा जगात अभ्यास सुरू झाला. फुले जलशातूनच डॉ आंबेडकरी जलशाची मिळालेली प्रेरणा आहे. तसेच डॉ आंबेडकरांच्या सर्वच साहित्यावर फुले विचारांचा प्रभाव आहे. म्हणून तर सत्यशोधक चित्रपटाचा शेवट डॉ आंबेडकरांच्या भाषणाने केलेला आहे.

सत्यशोधक चित्रपटात रा. फुलांची ब्राम्हणी व्यवस्थेविरुद्ध क्रांती दाखवलेली आहे. पण त्यात कुठेच चूकीचा सांस्कृतिक वारसा दाखवलेला नाही. उलट रा.फुलेंनी संत सावता यांचा वारसा जीवनभर जपून शेती केल्याचे दाखवलेले आहे. तसेच ब्राम्हणी समाजाविषयी त्यांनी कुठेच वैर व तिरस्कारही वापरलेला नाही. उलट ब्राम्हणी काशीबाईचे प्राण वाचवून तिचे बांळतपण सुखरुप करुन तिच्याच मुलाला दत्तक घेतले व लहानचे देश मोठे करुन त्याला आपले वारस नेमले. मग रा.फुले यांनी ब्राम्हणांविरुद्ध ब्राम्हणेतर चळवळ का आयुष्यभर चालवली? तर याचे उत्तर साधे आणि सरळ आहे आणि ते म्हणजे ब्राम्हणी वर्णाने वर्ण श्रेष्ठत्वाच्या नावाखाली स्वार्थापोटी केलेले ब्राम्हणेतरांचे शोषण हे होय.

या चित्रपटात जवळजवळ रा. फुलेंनी जीवनातील सर्वच घटना दाखवण्याचा दिग्दर्शकाने प्रयत्न केलेला आहे. मुलींची शाळा, वडील गोविंदरावांनी विरोध, उद्योग व्यवसाय, सत्यशोधक विचारधारा व सत्यशोधक धर्म स्थापना, महात्मा पदवीने जनगौरव इ. इ.

पण या चित्रपटात दिग्दर्शक एक घटना दाखवायचे विसरले व ती घटना म्हणजे, रा. फुले त्यांच्या तारुण्यावस्थेत गंज पेठेतील नारायण बुवांच्या कबीर मठात ‘कबीर बीज’ शिकण्यासाठी घालवलेल वयाची दीड दोन वर्षे हि होय. कारण हि घटना दाखवली असती तर डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना गुरू का मानले? याचा अर्थ समाजाला चांगलाच समजला असता. कारण काशीत असताना संत कबीराने गेयेला जावून भ. गौतम बुद्धांच्या साहित्याचा अभ्यास केला. यानंतर संत कबीरांच्या साहित्याचा अभ्यास रा. फुले यांनी केला व रा. फुले त्यांच्या साहित्याचा अभ्यास. डॉ आंबेडकरांनी केला. म्हणून संत कबीर, रा. फुले व डॉ आंबेडकर हे बुद्धांच्या जवळ गेले व त्यांना सामाजिक जागृतीच्या परिवर्तनाची जाणीव झाली व त्यासाठी त्यांनीआपले आयुष्य सार्थकी लावले. बुद्धांच्या जवळ गेलेल्या या तिन्ही महामानवांनी आपापले पंथ, धर्म स्थापन केले. संत कबीरांचा कबीर पंथ, रा. फुले यांचा सत्यशोधक , तर डॉ आंबेडकरांनी या सर्व धर्म, पंथाचेच एकमेव मर्म जाणून बौद्ध धम्म स्विकारला. म्हणून तर या सत्यशोधक चित्रपटाचा शेवट डॉ आंबेडकरांच्या समतावादी, बंधुतावादी व न्यायवादी विचाराने केला. म्हणजेच थोडक्यात दिग्दर्शकाने रा. फुले यांच्या. विचारांची व स्वप्नांची परिपूर्ती डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गक्रमणात व विचारात दाखवली. याच आंबेडकरी मार्गाने ओबीसी समाजाला बुद्धांपर्यंत जावेच लागेल, तरच ओबीसी बांधवांचे राष्ट्रीयत्वाचे, बंधुत्वाचे स्वप्न साकार होईल.




तसेच या चित्रपटात लहुजी साळवे वस्ताद यांची भूमिका फार महत्वाची आहे. कारण जसे संत गाडगेबाबा हे डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते, तसेच वस्ताद लहुजी साळवे हे सुद्धा रा. फुलेंच्या पाठीशी कायम उभे राहिले. यामुळे माता सावित्रीबाईची भूमिका जेवढी पतीकार्य निष्ठेची आहे. तशीच वस्ताद लहुजी साळवे यांची आहे.

पण या चित्रपटात एक प्रसंग संशयास्पद असून त्याचे संदर्भ फुले साहित्यात कोठेच मिळत नाही आणि तो प्रसंग म्हणजे, सात ब्राम्हणी मित्रांनी रा. फुले यांच्या समाजकार्याला केलेली मदत व त्या ब्राम्हणांना ब्राम्हणी धर्मपीठाचसमोर उभे करण्याची शिक्षा हे होय. हि घटना दिग्दर्शकाने स्वत:च्या मनाने चित्रपटात घुसडवल्याची दाट शंका येते.

बाकी सर्वच कथानक दिग्दर्शकाने चांगलेच जुळवलेले असून ते कौतुकास्पद आहे. यामुळे हा चित्रपट प्रत्येकाने पहाण्यालायक बनला आहे. यासाठी हा चित्रपट सर्वच समाजाने पहावा व रा. फुले, माता सावित्रीबाई, वस्ताद लहुजी साळवे व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घ्यावे.असे वाटते.

**दिपक गायकवाड**

# तुमचे गावही होणार पर्यटनस्थळ

**गोंदिया:** पर्यटन संचालनालयाकडून सर्वोत्कृष्ट पर्यटन गाव ही स्पर्धा राबविण्यात येत आहे. या स्पर्धेंतर्गत गोंदिया विभागातील जिल्ह्यांमधून विविध आठ श्रेणीत प्रत्येकी पाच अर्ज मागविण्यात आले आहेत.जवळच्या प्रसिद्ध पर्यटनस्थळाच्या गावातील ग्रामपंचायत किंवा त्या गावाच्या विकासासाठी कार्यरत अशासकीय सामाजिक संस्थेकडून अर्जाद्वारे ऑनलाईन नोंदणी करु शकता, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

अलिकडे ग्रामीण भागातील अनेक गावे पर्यटन केंद्र होऊ लागली आहेत. निसर्गरम्य वातावरण, धबधबे आदींमुळे पर्यटकांचा राबता पाहायला मिळतो. याच पार्श्वभुमीवर गावागावात पर्यटनाला चालना मिळावी व तेथील पर्यटनस्थळे, कलासंस्कृती, परंपरा, वैशिष्टयपूर्ण वारसास्थळे, लोकसस्कृतीची माहिती सर्वत्र पोहोचावी, यासाठी केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्यावतीने बेस्ट टुरिझम व्हिलेज व बेस्ट होम स्टे स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेद्वारे जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर सर्वोत्कृष्ट पर्यटन गावाची निवड केली जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातून प्रत्येकी तीन गावे वारसा, कृषी, पर्यटन, हस्तकला, जबाबदार पर्यटन, साहसी पर्यटन, वेलनेस, व्हायब्रेंट अशा आठ श्रेणींमधून निवडण्यात येणार आहेत. यासाठी नामांकन दाखल करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे. अर्जाना विहित नमुना ऑनलाईन पर्यटनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जानेवारी पर्यंत आहे.

सर्वोत्कृष्ट गाव म्हणून निवडण्यात आलेल्या गावाला पर्यटन मंत्रालयाकडून पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कारप्राप्त गाव भारत सरकारच्या विविध पोर्टल्स व संकेतस्थळांवर झळकणार आहे. यामुळे आपल्या गावाला भारताच्या नकाशावर पर्यटनासाठी सर्वोत्कृष्ट म्हणून आणण्याची ही एक संधी सरकारने दिली असून आता त्याची नोंदणी देखील सुरु झाली आहे. उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) यांना जिल्हा पर्यटन अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी http://www.rural.tourism.gov.in या संकेतस्थळाला भेट देवून माहिती प्राप्त करता येईल. या स्पर्धेत सहभागी होऊन जिल्ह्यातील पर्यटन वाढीस हातभार लावावा, असे आवाहन पर्यटन संचालनालय नागपूरचे उपसंचालक प्रशांत सवाई व जिल्हा नियोजन अधिकारी सुनील धोंगडे यांनी केले आहे.



**बेस्ट टुरिझम व्हिलेज नामांकनाकरिता जिल्ह्यातील पर्यटनक्षम असलेले खेडे, निरोगी गाव इत्यादी श्रेणी अंतर्गत ऑनलाईन अर्ज करु शकतात. जिल्ह्यातील पर्यटनक्षम खेड्यांनी २०२४ करीता आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत मोठ्या प्रमाणात सहभाग घेणे आवश्यक आहे. गोंदिया जिल्ह्यातील पर्यटनक्षम खेड्यांना सर्वोत्कृष्ट बेस्ट टुरिझम व्हिलेज स्पर्धा २०२४ च्या नामांकनासाठी अर्ज करावे.**

**चिन्मय गोतमारे, जिल्हाधिकारी**

### बेस्ट रुरल स्टे स्पर्धा

**ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात तसेच गावपातळीवर पर्यटन करणाऱ्या पर्यटकांना तेथील रुचकर भोजनासह निवासाची व्यवस्था व्हावी, जेणेकरुन पर्यटकांन मुक्काम करता येईल. यासाठी बेस्ट रुरल होम स्टे स्पर्धा घेण्यात येत आहे. यासाठी किसान एक वर्ष कार्यरत असलेल्या निवास व्यवस्थेचे संचालक एकूण १४ पैकी जास्तीत-जास्त ३ श्रेणीमध्ये अर्ज करुन स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.**

### या गावांना संधी

**जिल्ह्यात एकापेक्षा एक स्थळे आहेत. त्यात सालेकसा तालुक्यातील हाजराफाल धबधबा असलेले नवाटोला, त्रिलोकेश्वरधाम, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नवेगावबांध व प्रतापगड, तिबेट कॅम्प, देवरी तालुक्यातील धुकेश्वरी देवस्थान, तिरोडा तालुक्यातील सुकडी (डाकराम), आमगाव तालुक्यातील महादेव पहाडी, लुंबिनी वन पर्यटन, गोंदिया तालुक्यातील नागरा, वाघनदी, गोरेगाव तालुक्यातील पांगडी यासह इतर गावांना देखील या स्पर्धेत सहभागी होण्याची चांगली संधी आहे.**

# गोरेगांव क्षेत्रामध्ये विविध विकासकामांचे भुमीपुजन व लोकार्पण



**तिरोडा:-** विधानसभा क्षेत्रातील गोरेगाव तालुक्यात विविधविकास कामे आमदार विजय रहांगडाले यांच्या माध्यमातून मंजूर असून सदर बांधकामाचे भूमिपूजन नुकतेच आमदार यांच्या हस्ते संपन्न झाले. यामध्ये प्रामुख्याने प्राथमिक शाळा हिरडामाली येथे ६०.०० लक्ष, तिर्थक्षेत्र विकास निधी अंतर्गत तिर्थक्षेत्र संत बह्याबाबा मंदिर कवलेवाडा येथे ४२. ५० लक्ष जिल्हा परिषद शाळा बोरगाव येथे १८. ५० लक्ष, बोरगांव नवरगांव सिमेंट रस्ता १० लक्ष जिवन मिशन अंतर्गत पाणी टाकी बांधकाम ३२. २९ रुपये लक्ष शहिद जान्या तिम्या जिल्हा परिषद शाळा येथे भारताचे माजी पंतप्रधान श्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंती प्रित्यर्थ शाळेत अटल लॅब ५० लक्ष रुपये, ३ नविन वर्गखोल्या व मुलिचे स्वच्छतागृह इमारतीचे लोकार्पण, निधी ६० लक्ष रुपये. सन २०२३-२४ आदर्श ३ नविन वर्गखोली इमारत, निधी ४२ लक्ष रुपये. जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ अंतर्गत नविन प्रवेशद्वार, मुलांचे स्वच्छतागृह शालेय परिसराचे नुतनीकरण व इमारत दुरुस्ती, निधी ६० लक्ष रुपये. एकुन २ कोटी १२ लाख रुपयांचे विकासकामांचे भुमिपुजन सोहळा जि. प. शहिद जान्या तिम्या हायस्कूल गोरेगांव येथे पार पडला.

प्रामुख्याने या कार्यक्रमामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष विजय रहांगडाले आमदार तिरोडा गोरेगांव विधानसभा व भुमिपुजक जि.प. अध्यक्ष पंकज रहांगडाले, माजी आमदार हेमंत पटले, पं.स.सभापती मनोज बोपचे, कृउबास सभापती गिरीधारीजी बघेले, जि.प.सदस्य लक्ष्मन भगत, जि.प.सदस्य शैलेश नंदेश्वर, जि.प.सदस्य सौ. प्रितीताई कतलाम, जि.प.सदस्य जितेंद्र कटरे सदस्य, उपसभापती राजकुमार यादव, कृषबास सदस्य तेजेंद्र हरिणखेडे, पं.स.सदस्य ओमप्रकाश कटरे, पं.स. सदस्य सौ. चित्रकला चौधरी, पं.स. सदस्य किशोर पारधी, भाजप अध्यक्ष संजय बारेवार, पं.स.सदस्य सौ. सुप्रिया गणविर, माजी नगराध्यक्ष गोरेगांव आशिष बारेवार, कवलेवाडा सरपंच सौ. शकुंतलाबाई कटरे, हिरडामाली सरपंच महेश चौधरी, भारत ठाकुर, बोरगांव सरपंच सौ. मनिषा चोपकर, सौ.तानेश्वरी दिनेश जमदाळ, तसेच स्थानिक गांवकरी व भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

### डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समितीचे हर्षपाल रंगारी अध्यक्ष

**गोंदिया**-विश्व भूषण, भारतरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती (रजि.एफ.८९०४)ची सर्वसाधारण सभा स्थानीक शासकीय विश्रामगृह येथे समिती अध्यक्ष अमितकुमार भालेराव यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत वर्ष २०२४ करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सवच्या अध्यक्ष पदी गोंदिया नगर पालिकेचे माजी उपाध्यक्ष हर्षपाल रंगारी यांची निवड करण्यात आली. व त्यांना समितीच्या कार्यकारिणी मनोनीत करण्याचे अधिकार दिले. या सभेत डॉ.राजेंद्र वैद्य,घनश्याम पानतवणे,वाय.एस.तागडे,एस.डी.महाजन,मिलिंद गणवीर,श्याम चौरे,अमर राऊत ,सुनील मेश्राम,आकाश टेम्भूर्णीकर, वेदांत गजभिये,शेखर भालेराव, शैलेश टेम्भेकर,जितेंद्र सतिसेवक, आशिषकुमार चव्हाण,अनिल डोंगरे,कपिल नागदेवे,गौरव गेडाम, सचिन चौरे, प्रशांत बोरकर आदी उपस्थित होते.

# सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठात उषाकिरण आत्राम यांचा मनोवेधक सत्कार

**गोंदिया:-** सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून ३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सुप्रसिद्ध लेखिका उषाकिरण आत्राम यांचा अत्यंत मनोवेधक सत्कार करण्यात आला. सोबतच ज्येष्ठ साहित्यिक डॉ.केशव सखाराम देशमुख यांचाही सत्कार करण्यात आला.

विशेष असे की विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ.तुकाराम रोंगटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कविसंमेलन व विविधांगी कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी उषाकिरण आत्राम होत्या. विद्यार्थ्यांनी वर्तमानाचा आणि भविष्याचा वेध घेणाऱ्या अत्यंत मार्मिक कविता व गीत सादर करुन कार्यक्रमाला चांगलीच रंगत आणली. आदिवासी संस्कृतीत महिलांचे स्थान, भाषा आणि लोकसाहित्य यावर जीवनमित्र उषाकिरण आत्राम यांची प्रकट मुलाखत व डॉ. केशव देशमुख यांच्या शेतीमातीच्या कवितांबद्दलची चर्चा बहारदार ठरली.



मराठी विभाग प्रमुख डॉ.तुकाराम रोंगटे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उषाकिरण आत्राम आणि डॉ.केशव देशमुख यांच्या साहित्यावर अत्यंत कल्पकतेने भितिचित्र प्रदर्शन आयोजित करुन दोघांनाही आश्चर्यकारक धक्का दिला. तर उषाकिरण आत्राम यांच्यावर विशेषांक काढण्यात आला. या प्रसंगी दोन्ही प्रतिभावंत लेखकांचा महावस्त्र, स्मृतिचिन्ह व ग्रंथ प्रदान करुन सत्कार करण्यात आला. या जयंती कार्यक्रमाला विद्यापीठातील प्राध्यापकवृंद, विद्याथी व अन्य महाविद्यालयातील विद्यार्थी सुद्धा बहुसंख्येने उपस्थित होते.

# शिक्षक म्हणजे माणसं घडविणारा दुत:-इंजि.यशवंत गणविर

**गोंदिया:-** जिल्हा नियोजन समितीच्या सभागृह गोंदिया येथे शिक्षक गौरव पुरस्कार व प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा सभापती शिक्षण क्रीडा व आरोग्य इंजि यशवंत गणविर यांच्या शुभहस्ते, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांच्या अध्यक्षतेखाली झाले.



यावेळी उद्घाटन पर मनोगत व्यक्त करताना इंजि.गणवीर म्हणाले की, जिल्ह्यात सुमारे चार हजार शिक्षक जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कार्यरत आहेत. जवळपास नव्वद हजार विद्यार्थी ज्ञानार्जन करत आहेत. आपल्या शाळेत शिकत असलेले विद्यार्थी हे उद्याचे भविष्य आहे. त्यामुळे त्यांना योग्य मार्गदर्शन करणे. प्रत्येक विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता सारखी नसते. परंतु प्रत्येकाच्या अंगात काहीतरी सुप्त गुण असतात त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व यातुनच आपण सुज्ञ,तज्ञ, शिक्षित, सुशिक्षित, सुसंस्कृत व सृजनशील नागरिक घडविण्याचे कार्य करावे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, आपल्या विद्यालयात गोर गरीब शेतकरी व शेतमजुरांची पाल्य शिक्षण घेण्यासाठी येतात. त्यांची सर्वस्वी जबाबदारी स्वीकारुन आपण त्यांना घडवावे.कारण दिवसभर काम करुन थकून भागून येणाऱ्या पालकांना आपल्या पाल्यांनी वर्गात काय शिकले हे विचारण्यासाठी वेळ मिळत नसतो. म्हणुन आपणच त्यांना योग्य अध्यापन त्यासोबत योग्य मार्गदर्शन करावे कारण शिक्षक हा माणसं घडवित असतो ज्याप्रमाणे कुंभार मातीला आकार देऊन सुंदर मडके घडवितो त्याप्रमाणे आपणही शेवटच्या श्वासापर्यंत सृजनशील नागरिक घडविण्याचे कार्य करावे तेव्हाच आपल्याला मिळालेल्या या पुरस्काराचे सार्थक होईल.असे प्रतिपादन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला प्रामुख्याने पुजाताई अखिलेश सेठ सभापती समाज कल्याण, सविताताई पुराम सभापती महिला व बालकल्याण, जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मण भगत, सुरेश हर्षे, नेहा तुरकर, अश्विनी पटले, लायकराम भेंडारकर, चतुर्भुज बिसेन, विमल कटरे, छबुताई उके, प्रितीताई कतलाम, शिक्षणाधिकारी प्राथमिक डॉ महेंद्र गजभिये, शिक्षणाधिकारी माध्यमिक कादर शेख शिक्षण विभागाचे अधिकारी व कर्मचारी तथा जिल्ह्यातुन आलेले शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# ई पिक पाहणी ॲप मध्ये सुधारणा करा-आ.विजय रहांगडाले यांची मागणी

**तिरोडा :-** शेतक-यांना खसरा नोंद करण्याकरिता मागील ३ वर्षापासून महसूल विभाग महाराष्ट्र शासनाने इ पिक मोबाईल ॲप कार्यान्वित केले असून शेतक-यांना आपल्या बांधावर जावून पिकाची फोटो काढून खसरा नोंद करण्याचे आदेश दिले आहेत.

बहुतांश शेतकरी वर्गाजवळ अद्याप अद्राईद मोबाईल उपलब्ध नसल्याने इतर व्यक्तीची मदत घ्यावी लागते व बहुतांश गावी नेटवर्कची अडचण असल्याने खसरा नोंन्दीमध्ये चुका आढळून येतात, ई पिक पाहणी ॲपमध्ये खसरा नोंद करण्याकरिता मर्यादित कालावधी असून एकदा जमा करण्यात आलेली माहिती कालावधी गेल्यावर दुरुस्त करता येत नाही तसेच ज्या शेतक-यांनी ई पिक ॲपमध्ये खसरा नोंद केले आहे त्यांनाच शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रावर धान विक्री करता येतात तांत्रिक अडचनीमुळे ज्या शेतक-यांचे खसरा नोंद झाले नाही असे शेतकरी शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रावर धान विक्रीपासून वंचित राहत असतात सदर खसरा नोंद दुरुस्त करण्याची सुविधा तलाठी यांच्या लॉगीनमध्ये दिल्यास शेतकऱ्यांना उद्भवनाऱ्या समस्या दूर करता येतील तेव्हा सदर खसरा दुरुस्त करण्याची सुविधा तलाठी यांच्या लॉगीनमध्ये देण्यात यावी, खरीप व रबी हंगामात नियमित पीकपेरा भरण्याची सुविधा तलाठी लॉगीनमध्ये देण्यात यावी, शासकीय आधारभूत धान खरेदीची नोंदणी सुरु असेपर्यंत लिंक सुरु ठेवण्यात यावी जेणेकरुन शेतकऱ्यांना शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रावर धान विक्री करणे सोयीचे ठरेल असे आशयाचे पत्र जिल्हाधिकारी यांना दिले आहे यावर जिल्हाधिकारी यांनी तातडीने जमावबंदी आयुक्त यांना पत्र पाठवून सदर समस्या मार्गी लावण्याबाबत कळविले आहे.



### पैशाच्या वादातून कुडवा परिसरात युवकाची हत्या,तीन आरोपी अटक

**गोंदिया :-** कुडवा परिसरात ७ जानेवारी रोजी मध्यरात्री दरम्यान एका युवकाची उसनवारी पैशाच्या वादातून हत्या करण्यात आली. मनीष भालाधरे रा.कुडवा असे मृतकाचे नाव आहे. या संदर्भात रामनगर पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, मृतक हा कुडवा येथील रहिवासी असून त्याचे नाव मनीष भालाधरे आहे. सदर घटना गोंदिया ते धापेवाडा मार्ग परिसरातील आहे. मृतक व आरोपी यांच्यामध्ये उधारीच्या पैशावरुन वाद असल्यामुळे या पूर्वी ही अनेकदा वाद विवाद होत होते. मात्र आज मध्यरात्री झालेला वाद इतका विकोपाला गेला की त्या वादाचा अंत हत्येमध्ये झाला. पोलीस तपासात या प्रकरणात एकूण पाच आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यापैकी ३ आरोपीना अटक करण्यात आली असून १२ जानेवारीपर्यंत कोठडी देण्यात आली आहे. अट्रासिटीचाही गुन्हा दाखल केला ओ.

मध्यरात्री मृतक व आरोपी यांच्यात कडाक्याचे भांडण होऊन त्याला हत्येचे स्वरुप आले. या घटनेची माहिती मिळताच रामनगर पोलिसांनी घटनास्थळ गाठत सदर प्रकरणातील आरोपींचा शोध घेतला. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक राजू बस्तवाडे यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे. याच कुडवा परिसरात दोन महिन्यांपूर्वी देखील अशाच प्रकारे प्रेम प्रकरणातून झालेल्या वादातून एका युवकाची हत्या करण्यात आली होती. हत्येच्या अशा घटनांनी कुडवा परिसरातील सामान्य जनमानसाच्या मनात हळहळ व्यक्त होत आहे.

# सावित्रीबाई फुले यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी:-आ.मनोहर चंद्रिकापुरे

**अर्जुनी मोरगाव :-** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी अपार कष्ट सोसून भारतातील स्त्रियांना शिक्षणाचे दार उघडून दिले .आज स्त्रिया सर्व क्षेत्रात उंच भरारी घेत आहेत. ही सर्व किमया केवळ महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरा मुळेच घडली. सावित्रीबाई फुले यांनी महिलांना शिक्षित केले. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून महिलांना समानतेचा दर्जा देऊन न्याय मिळवून दिला. त्यामुळे हे महापुरुष आपणासाठी आदर्शच आहेत. आज महिलांनी उमेद व ग्राम संघ तथा बचत गटाच्या माध्यमातून मोठी प्रगती केली आहे ही सर्व किमया केवळ सावित्रीबाई फुले मुळेच घडली. महिलांनी सावित्रीबाई फुले यांचे विचार अंगीकृत करुन सर्वत्र प्रगती करावी. कारण सावित्रीबाई फुले यांचे विचार व कार्य सर्वांसाठी प्रेरणादायीच आहेत असे विचार आमदार मनोहरराव चंद्रिकापुरे यांनी व्यक्त केले.



३ जानेवारी रोजी तालुक्यातील सावरटोला/बोरटोला येथे ग्राम संघाच्या महिला मंडळींनी आयोजित केलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात आमदार चंद्रिकापुरे बोलत होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी या विभागाच्या जिल्हा परिषद सदस्य रचनाताई गहाणे होत्या. अतिथी म्हणून सरपंच युवराज तरोणे, उपसरपंच सुवर्णा तरोणे, ग्रामपंचायत सदस्य डॅनी डोये, धर्मेंद्र गजबे, दिलीप मेश्राम, उर्मिला शिवणकर, कविता चचाने, सीमा शेंडे, शंकर तरोणे, योगेश लाडे, वामन राऊत, महादेव डोये, राजेंद्र तरोणे, पांडुरंग भोपे, राधेश्याम तरोणे, नरेश खोब्रागडे, पत्रकार सुरेंद्रकुमार ठवरे, प्रशांत लाडे, तथा बचत गटाच्या महिला पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होत्या.

ग्रामपंचायत सावरटोला येथे आयोजित जयंती कार्यक्रम संकल्प समृद्धी ग्राम संघ स्फुर्ती महिला मंडळ सावरटोला यांच्या सौजन्याने घेण्यात आला. सर्वप्रथम महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमांना माल्यार्पण व दीप प्रज्वलित करुन फुले दांपत्यांना अभिवादन करण्यात आले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जयंतीचे औचित्य साधून सावरटोला येथे आदिवासी उपाय योजनेअंतर्गत सभागृह बांधकाम व तांडा वस्ती योजनेअंतर्गत सिमेंट नाली बांधकाम अशा दोन्ही मिळून २५ लाखाच्या बांधकामाचे भूमिपूजन आमदार मनोहरराव चंद्रिकापुरे यांचे हस्ते करण्यात आले, यावेळी रचना गहाणे यांनीही सावित्रीबाई फुले यांचे जीवन कार्यावर प्रकाश टाकून आता महिला अबला राहिल्या नसून सबला झाल्या आहेत. सावित्रीबाई फुले यांनी दिलेल्या शिक्षणाच्या माध्यमातून महिलांनी फार मोठी प्रगती केली आहे. सर्वच क्षेत्रात महिला अग्रसेर आहेत. महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी व्यवसायिक प्रगती करावी व आपले कुटुंब सक्षम करण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक सरपंच युवराज तरोणे, संचालन आशा सेविका निशाताई शिवणकर यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.



# पोलिस बंदोबस्तात बिरसी विमानतळ विस्तारीकरणाच्या कामाला सुरुवात; गावकऱ्यांमध्ये संताप

**गोंदिया:-** तालुक्यातील बिरसी विमानतळाच्या कामाला शनिवार (दि. ६) सकाळी चोख पोलिस बंदोबस्तात सुरुवात करण्यात आली. बिरसी विमानतळाच्या विस्तारीकरणात अडथळा ठरणारा परसवाडा ते कामठा मार्ग बंद करण्यात आला; मात्र हा मार्ग बंद करण्याची प्रशासन व बिरसी विमानतळ प्राधिकरणाने कुठलीही पूर्वसूचना न देता सुरुवात केली.यामुळे या परिसरातील गावकऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला होता. आधी पर्यायी रस्ता तयार करा नंतरच रस्ता बंद करा, अशी मागणी करीत धरणे आंदोलन सुरू केले आहे.

बिरसी विमानतळ प्राधिकरणाने यापूर्वी ११ डिसेंबर रोजी परसवाडा-कामठा मार्ग बंद करण्यासाठी काम सुरू केले होते; पण गावकऱ्यांनी याला विरोध करीत रस्त्याचे काम खोदकाम करण्यासाठी आलेली यंत्रणा परत पाठविली होती.



### आधी माहिती का दिली नाही, गावकऱ्यांचा आक्षेप

**शुक्रवारी (दि.५) उपविभागीय अधिकारी व बिरसी विमानतळाचे संचालक यांनी परसवाडा ग्रामपंचायत कार्यालय येथे भेट दिली. तेव्हासुद्धा त्यांनी गावकऱ्यांना परसवाडा-कामठा मार्ग बंद करण्यात येणार असल्याची कुठलीही पूर्वसूचना दिली नाही. तर पर्यायी मार्ग तयार करण्यापूर्वी आणि कुठलीही पूर्वसूचना न देता रस्ता बंद करणे अयोग्य असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे.**

गावकऱ्यांचा बिरसी विमानतळाच्या विस्तारीकरणाला विरोध नाही; पण परसवाडा कामठा मार्ग बंद करण्यापूर्वी त्याला पर्यायी रस्ता तयार करुन देण्यात यावा, ही गावकऱ्यांची मागणी आहे. जोपर्यंत पर्यायी रस्ता तयार करुन देणार नाही तोपर्यंत हा रस्ता बंद करू देणार नाही, अशी भूमिका गावकऱ्यांनी घेतली होती; मात्र शनिवारी (दि.६) सकाळी बिरसी प्राधिकरण व प्रशासनाने गावकऱ्यांना कुठलीही पूर्वसूचना न देता चोख पोलिस बंदोबस्तात परसवाडा-कामठा मार्ग बंद केला. यामुळे काही वेळ तणावाची स्थिती निर्माण झाली होती. दरम्यान, गावकऱ्यांनी पर्यायी रस्ता तयार करण्याच्या मागणीला घेऊन धरणे आंदोलन सुरू केले आहे.

> "बिरसी विमानतळ प्राधिकरणाने पर्यायी मार्ग तयार केल्यानंतर कामठा-परसवाडा हा मार्ग बंद करायला पाहिजे होता; पण प्रशासनाने तसे न करता हा मार्ग बंद करुन गावकऱ्यांना अडचणीत आणले आहे. बिरसी विमानतळ विस्तारीकरणाच्या कामाला आमचा कुठलाच विरोध नाही; पण पर्यायी रस्ता तयार करुन द्यावा, ही आमची मागणी आहे.
>
> **- लखन हरीणखेडे,** सामाजिक कार्यकर्ता, परसवाडा

> "परसवाडा-कामठा मार्ग बंद करण्यापूर्वी विमानतळ प्राधिकरणाचे पर्यायी रस्ता तयार करुन दिला नाही. त्यामुळे हा पर्यायी रस्ता तयार करुन देईपर्यंत गावकऱ्यांचे आंदोलन सुरू राहील.
>
> **-मनोहर भावे,** सामाजिक कार्यकर्ता, परसवाडा

> "परसवाडा-कामठा मार्ग बंद केल्याने शेतकरी, गावकरी व विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठी अडचण होणार आहे. त्यांना आठ ते दहा किमीचा फेरा मारुन जावे लागणार आहे. त्यामुळे आधी पर्यायी रस्ता तयार करुन देणे गरजेचे आहे.-
>
> **रेखा जगदीश पारधी,** सरपंच ग्रा.पं., परसवाडा

# तब्बल वर्षभरानंतर उड्डाणपुलाच्या बांधकामाचा मिळाला मुहूर्त; वर्षभरात होणार पुर्ण काम

**गोदिया :-** शहरातील गोंदिया-बालाघाट मार्गावरील रेल्वे उड्डाणपुल बांधकामाला शनिवारपासून (दि.६) सुरुवात झाली. वर्षभरानंतर या उड्डाणपुलाच्या कामाचा प्रशासनाला मुहूर्त मिळाल्याने शहरवासीयांना थोडा दिलासा मिळाला आहे. तर वर्षभरात या पुलाचे बांधकाम पुर्ण केले जाणार असून शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यास मदत होणार आहे.

गोंदिया-बालाघाट मार्गावरील जुना उड्डाणपुल जीर्ण झाल्याने हा पूल वर्षांपुवी पाडण्यात आला होता. पण नवीन पुलाचे बांधकाम गेल्या वर्षभरापासून सुरु झाले नव्हते. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या समस्येत वाढ झाली होती. रेलटोली परिसरातील नागरिकांना शहरात येण्यासाठी पुलाअभावी मोठी अडचण झाली होती. तर अंडरग्राऊंड मार्गे वाहतूक सुरु असल्याने वाहतुकीची कोंडी आणि अपघातात वाढ झाली होती. त्यामुळे या उड्डाणपुलाचे काम लवकरात लवकर सुरु करण्याची मागणी केली जात होती. याचीच दखल घेत खा. प्रफुल्ल पटेल यांनी राज्य शासन आणि संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने शनिवारी या उड्डाण पुलाच्या बांधकामाला सुरुवात केली. त्यामुळे शहरवासीयांना दिलासा मिळाला आहे. पुलाचे बांधकाम सुरु करताना आ. विनोद अग्रवाल, माजी आ.राजेंद्र जैन उपस्थित होते.

### वाहतुकीची कोंडी सुटणार

**गोंदिया-बालाघाट मार्गावरील जूना उड्डाणपूल पाडण्यात आला. तर नवीन उड्डाणपुलावर पादचारी मार्ग नसल्याने हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक ठरला होता. त्यामुळे पुलाच्या पलिकडे राहत असलेल्या नागरिकांना शहरात येण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता. तर जुन्या उड्डाणपुलाअभावी वाहतुकीची कोंडी होत होती. मात्र आता पुलाच्या कामाला सुरुवात झाल्याने वाहतुकीची कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.**



> "गोंदिया-बालाघाट मार्गावरील उड्डाणपुलाचे काम लवकारत लवकर सुरु व्हावे व शहरवासीयांची अडचण दूर व्हावी यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला. त्याचेच फलित पुलाच्या बांधकामाला सुरुवात झाली आहे.
>
> **-प्रफुल्ल पटेल,** खासदार

> "जुना पूल पाडल्यानंतर नवीन उड्डाणपुलाचे काम लवकर सुरु करुन शहरवासीयांची अडचण दूर व्हावी, वाहतुकीची कोंडी सोडवावी यासाठी प्रयत्न सुरु होते. अखेर पुलाच्या बांधकामाला सुरुवात झाल्याने शहरवासीयांना दिलासा मिळाला आहे.
>
> **- विनोद अग्रवाल,** आमदार

> "उड्डाणपुलाच्या बांधकामाला शनिवारपासून सुरुवात झाल्याने वाहतुकीची कोंडी आणि अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.
>
> **- राजेंद्र जैन,** माजी आमदार

> "गोंदिया-बालाघाट मार्गावरील उड्डाणपुलाचे कामाला लवकर सुरुवात व्हावी यासाठी प्रयत्न सुरु होते. आता बांधकाम सुरु झाल्याने शहवासीयांची मोठी अडचण दूर झाली आहे.
>
> **- गोपालदास अग्रवाल,** माजी आमदार

# मोटारसायकल चोरींचा मोठा उलगडा बालाघाटचा चोरटा जेरबंद

**गोदिया:-** जिल्ह्यात विविध ठिकाणांवर घडत असलेल्या मोटारसायकल चोरी प्रकरणांचा मोठा उलगडा करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. गुन्हे शाखेचे बालाघाट येथून या मोटारसायकल चोरट्यास अटक केली असून, त्याच्याकडून चोरी केलेल्या सहा मोटारसायकल जप्त केल्या आहेत. स्थानिक गुन्हे शाखेने शनिवारी (दि. ६) ही कामगिरी केली असून, यानंतर आता आणखी काही प्रकरणांचा उलगडा होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

शहरासह जिल्ह्यात विविध ठिकाणांवर मोटारसायकल चोरीच्या घटना घडत आहेत. यावर पोलिस अधीक्षक निखील पिंगळे यांनी मोटारसायकल चोरट्यांना जेरबंद करण्याबाबत आदेश स्थानिक गुन्हेचे निरीक्षक दिनेश लबडे यांना दिले. त्यानुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शनिवारी (दि. ६) मोटारसायकल प्रकरणांतील चोरट्यांना शोधण्यासाठी तपास चक्रे फिरवित असता त्यांना रामनगर पोलिस ठाण्यांतर्गत चोरीला गेलेली मोटारसायकल (एमएच ४९ एवाय ७५९५)ला विवेक उर्फ राजा नरेंद्र कनोजे (रा. गड्डामोहल्ला, जि. बालाघाट) व अतुल श्यामलाल बिसेन (रा. लिंगा, जि. बालाघाट) यांनी चोरली असून, अशा कित्येक मोटारसायकल चोरुन विकण्यासाठी विविध ठिकाणी लपवून ठेवल्या असल्याची माहिती बातमीदारांकडून मिळाली.

त्याआधारे पथकाने विवेक कनोजे याला त्याच्या बालाघाट येथील राहत्या घरातून मोटारसायकल (एमएच ४९ एवाय ७५९५) सह ताब्यात घेतले. पथकाने त्याची आपल्या पद्धतीने विचारपूस केली असता त्याने अतुल बिसेन सोबत गोंदिया, नागपूर, कामठी अशा विविध ठिकाणांहून मोटारसायकल चोरी केल्याचे कबूल केले. यावर पोलिसांनी विविध ठिकाणी लपवून ठेवलेल्या सहा मोटारसायकल जप्त केल्या. यातील मोटारसायकल (एमएच ४९ एवाय ७५९५) रामनगर पोलिस ठाण्यांतर्गत गुन्ह्यातील असल्याने आरोपी व जप्त करण्यात आलेल्या मोटारसायकल रामनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आल्या आहेत. पुढील तपास रामनगर पोलिस करीत आहेत.

हीी कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक लबडे यांच्या नेतृत्वात पोलिस अंमलदार स. फौ. अर्जुन कावळे, हवालदार राजू मिश्रा, महेश मेहर, भुवनलाल देशमुख, चित्तरंजन कोडापे, घनश्याम कुंभलवार, संतोष केदार यांनी केली आहे.



### या मोटारसायकल पोलिसांनी केल्या जप्त

**पोलिसांनी विवेक कनोजे याच्याकडून मोटारसायकल (एमएच ४९ एवाय ७५९५), (एमपी ४० एमएम ५३७८), (सीजी ०४ एलएस १२०९), बनावट क्रमांक असलेली (एमपी ५० एसए ३०५९), खरा क्रमांक (एमएच ४०० बीएन ४४२), (एमएच ४९ एवाय ५५५४), (एमएच ४० सी ४४०५), अशा दोन लाख ८० हजार रुपये किमतीच्या सहा मोटारसायकली जप्त केल्या आहेत.**

## ग्रा.पं.कर्मचाऱ्यांचे जळगाव येथे १६ जाने.पासून बेमुदत धरणे

**गोंदिय-**महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघ (आयटक संलग्न )च्या नेतृत्वात राज्यातील जवळपास ६० हजार कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना घेऊन ग्राम विकास मंत्री ना. गिरीश महाजन द्वारे याकडे सातत्याने दुर्लक्ष करुन आश्वाशने देऊनही बैठक घेण्याचे टाळत असल्याने त्रस्त झालेले कर्मचारी १६ जानेवारी पासून ना. महाजन यांचे जळगाव येथील संपर्क कार्यालयावर बेमुदत धरणे आंदोलनाला सुरवात करणार आहेत.

# शासकीय रक्त संकलन पेढीत रक्ताचा तुटवडा

**गोंदिया:-** शासकीय रक्त संकलन पेढीत रक्ताचा आजघडीला तुटवडा आहे. रक्तदान कमी व रक्ताची मागणी जास्त असल्यामुळे रक्तदान शिबिराची मोठ्या प्रमाणात गरज आहे. जीवन मरणाच्या दारात असलेल्यांना आशेचा किरण दाखविणाऱ्या येथील रक्तपेढीत रक्ताचा पुरवठा व्हावा यासाठी प्रत्येक सुदृढ नागरिकांनी स्वयंस्फूतीने रक्तदान करण्याची गरज आहे.जिल्ह्यातील १५ लाख लोकसंख्येसाठी एकमेव रक्त संकलन पेढी येथील शासकीय बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयात आहे.



येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय येथे जिल्ह्याच्या सीमावती राज्य मध्यप्रदेश, छत्तीसगडसह सीमावरती जिल्ह्यातील नागरिकही उपचार घेतात. सिकलसेलग्रस्त, प्रसूत महिला व अपघातग्रस्तांना रोज १२ ते १५ पिशव्या रक्ताची गरज असते. सेवाभावी संस्था, राजकीय पक्षांच्या माध्यमातून आयोजित शिबिरातून रक्तसंकलन केले जाते. खासगी रक्तसंकलन पेढ्या जिल्ह्यात रक्तसंकलन करुन नागपूर येथे नेतात. नेत्यांचा वाढदिवस, सण, उत्सव, संस्थांचा वर्धापण दिनानिमित्त रक्तदान शिबिराच्या आयोजनातून अनेक जण रक्तदान करतात.

काही लोक शासकीय रक्तसंकलन पेढीला तर काही खासगी पेढ्यांना रक्त देतात. शासकीय रक्तसंकलन पेढीत रक्तदान केल्यास डोनरकार्डवर रक्ताचा पुरवठा निःशुल्क केला जातो. रक्तदाता नसल्यास व रुग्ण शासकीय रुग्णालयात दाखल असल्यास ४५० रुपये व खाजगी रुग्णालयात दाखल असल्यास ८५० रुपये शुल्क घेतले जाते. परंतु खासगी रक्तसंकलन पेढ्या रक्ताच्या एका पिशवीसाठी १२०० ते १५०० रुपये घेतात. येथील शासकीय रक्तपेढीत तीन दिवस पुरेल एवढाच रक्त साठा शिल्लक आहे. गरजूंना रक्त मिळावे म्हणून बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयातील रक्तपेढीत प्रत्येक सुदृढ व्यक्तीने रक्तदान करण्याची गरज आहे.

रक्तदानासाठी पोषक वातावरण आहे. रक्तदान करण्यासाठी नागरिकांमध्ये उदासीनता दिसून येत आहे. रक्तदान शिबिराचे आयोजनही कमी झाले आहे. सिकलसेलग्रस्त, प्रसुत महिला, अपघातग्रस्तांना रक्तांची गरज असते.

आजस्थितीत शासकीय रक्तपेढीत केवळ तीन दिवस पुरेल एवढाच रक्तसाठा आहे. सेवाभावी संस्था, राजकीय संस्थांनी रक्तदान शिबिराचे आयोजन करावे, प्रत्येक सुदृढ नागरिकांनी भीती न बाळगता रक्तदान करावे, असे आवाहन शासकीय रक्तपेढीचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. संजय माहुले यांनी केले आहे.

## तलाठी भरती निवड प्रकियेत प्रलोभनाला बळी पडू नये-जिल्हाधिकारी गोतमारे

**गोंदिया:-** महाराष्ट्र महसूल विभागाच्या वतीने घेण्यात आलेली तलाठी भरती परीक्षा ऑगस्ट ते १४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत पार पडली. आता परीक्षा दिलेले उमेदवार महाराष्ट्र तलाठी भरती २०२३ च्या निकालाची आतुरतेने वाट पाहत आहेत.राज्यस्तरावरुन या परिक्षेचा निकाल अद्यापही लागलेला नसून निवड यादी सुद्धा प्रकाशित झालेली नाही, त्यामुळे कुठल्याही परिक्षार्थी उमेदवारांने नौकरी लावून देण्याचे प्रलोभन देणाऱ्या एजंटाला बळी पडू नये असे आवाहन गोंदियाचे जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे. तसेच कुणी यांसदर्भात नौकरी लावून देण्याचे प्रलोभन देत असल्यास जिल्हा प्रशासनाला कळविण्याचे आवाहन केले आहे.



गोंदिया जिल्हा महसूल विभागातर्गत (Talathi) तलाठी पदाच्या ६० जागांकरीता परिक्षा टीसीएस कंपनीमार्फत घेण्यात आली.यात ९३३० परिक्षार्थी सहभागी झाले होते. ही परिक्षा टीसीएस कंपनीतर्फे राज्यस्तरावर घेण्यात आली असून परिक्षेचा निकाल अद्यापही जाहीर करण्यात आलेला नाही.मात्र विदर्भात तलाठी भरतीच्या नावावर परिक्षार्थी उमेदवारांना नौकरी लावून देण्याच्या नावावर काही एजंटानी फिरणे सुरु केल्याच्या चर्चेमुळे जिल्हा प्रशासन सतर्क झाले आहे. तलाठी भरतीमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांना जोपर्यंत निकाल लागत नाही व निवड यादी प्रकाशित होत नाही, तोपर्यंत अशा कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता जनतेने सावध राहावे असे आवाहन जिल्हाप्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रशासनातर्फे जे शक्य आहे ते केले जाईल-चिन्मय गोतमारे

**गोंदिया:** एकेकाळी ज्यांनी प्रशासनिक सेवा, समाजकारण व राजकारण या क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे, त्यांनी आपले आयुष्य समाजासाठी खर्ची घातले आहे. अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी मदत करण्यासाठी जिल्हा प्रशासन सदैव तत्पर आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी जेवढे शक्य आहे तेवढे सहकार्य करण्यास प्रशासन कटिबद्ध असल्याची ग्वाही जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी दिली.

ज्येष्ठ नागरिकांचा कुटूंब तसेच समाजाने आदर करुन त्यांना सम्मानजनक वागणूक देणे आपले कर्तव्य आहे. ज्येष्ठ नागरिकांची हेळसांड होणार, आपल्या कृत्यामुळे त्यांना त्रास होणार नाही याचीसुद्धा काळजी सर्वांनी घेतली तर ज्येष्ठ नागरिकांनासुद्धा सन्मानाने जगता येईल, असे मत जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी व्यक्त केले. ज्येष्ठ नागरिक सेवा संघाच्यावतीने जिल्ह्यात पहिल्यांदाच ज्येष्ठ नागरिकांसाठी शनिवारी स्थानिक रामदेवराव सभागृहात आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.




यावेळी आ.विनोद अग्रवाल, माजी आ.राजेंद्र जैन, रमेश कुथे, शुभांगी सुनील मेंढे, सामाजिक न्याय विभाग व विशेष सहाय्य विभागाचे सहायक आयुक्त विनोद मोहतुरे, ज्येष्ठ साहित्यिक व ज्येष्ठ नागरिक सेवा संघाचे कार्याध्यक्ष लखनसिंह कटरे, अध्यक्ष नारायणप्रसाद जमईवार उपस्थित होते. यावेळी गोंदिया शहरातील ८१ वर्षीय धावपटू मुन्नालाल यादव यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ नागरिक सेवा संघाचे सचिव दुलिचंद बुद्धे यांनी मांडले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. मंजुश्री देशपांडे यांनी केले.

कार्यक्रमासाठी अनुप शुक्ला, दिलीप देशमुख, संजय कटरे, शरद क्षत्रिय, पुरुषोत्तम मेंढे, मधुकर चौरागडे, दीपक कदम, डॉ. माधुरी नासरे, विठ्ठलराव भरणे, लीलाधर पाथोडे, लखनसिंह कटरे, वजीर बिसेन, प्रा. सिद्धार्थ मेश्राम, बाळकृष्ण बिसेन, चांडोराव बिसेन, विनायक चव्हाण, डी.यू.रहांगडाले, शैलेंद्र शुक्ला, राजेंद्र जगताप, अल्का शुक्ला, धनीषा कटरे, पुष्पा लाखेकर, ज्योती देशमुख, प्रभा बुद्धे, भावना कदम, कलाताई गुर्वे, निशा जमईवार यांनी सहकार्य केले.

### ५५ ज्येष्ठ नागरिकांनी केले कलागुणांचे सादरीकरण

या कार्यक्रमात ५५ ज्येष्ठ नागरिकांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेत आपल्यातूील सुप्त गुणांची चुणूक दाखवून दिली. हम बुढे हुए तो क्या हुआ म्हणत उपस्थित श्रोत्यांचे लक्ष वेधून घेतले होते. यावेळी डॉ. वैभव नासरे यांनी या वयात अजिबात घाबरु नका मी डॉक्टर म्हणून आपल्यासोबत आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांना आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला दिला.

## गुरुवारी राज्याचे तीन मंत्री जिल्ह्यात

**गोंदिया:** माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांच्या विनंतीवरुन राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, अल्पसंख्याक कल्याणमंत्री अब्दुल सत्तार आणि वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ हे गुरुवार (दि.११) रोजी गोंदिया दौऱ्यावर येत आहेत.

गुरुवारी रावणवाडी येथील माता मंदिर प्रांगणात २५ लाख रुपये खर्चून बांधलेले मंडल अधिकारी भवन आणि इतर बांधकामांचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. यनिमित्त शेतकरी परिषदेचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी ५.३० वाजता माजी आमदार गोपालदास अग्रवाल आणि ख्वाजा



गरीब नवाज अल्पसंख्यंक बहुउद्देशिय संस्थेच्या मार्गदर्शनाखाली समाजाचा सामुहिक विवाह व प्रसिद्ध कव्वाल जुनैद सुलतानी यांच्या शानदार कव्वाली कार्यक्रमाचे उद्घाटन सर्व पाहुण्यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल, पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम, खा. सुनील मेंढे, माजी पालकमंत्री डॉ. परिणय फुके, माजी विधानपरिषद सदस्य राजेंद्र जैन, पंकज रहांगडाले अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. जास्तीत-जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन माजी आमदार गोपालदास अग्रवाल, तालुका भाजप अध्यक्ष धनलाल ठाकरे, सरफराज गोडील व या ख्वाजा गरीब नवाज अल्पसंख्यांक बहुद्देशिय संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी केला आहे.

## दांडेगाव येथील अपघातातील मृतकांना १० व जखमींना ५ लाखाची मदत करा

**गोंदिया:-** तालुक्यातील दांडेगाव येथे २६ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी १२. ४५ वाजेच्या सुमारास गोंदिया तिरोडा मुख्य रस्त्यावर झालेल्या टवेरा गाडीचा भीषण रस्ता अपघातात ५ लोकांचा मृत्यू झाला. या भीषण अपघातातील मृतकांना मुख्यमंत्री सहायता निधी अंतगर्त १० लाख रुपये व जखमींना ५ लाख रुपये मदत राशी देण्यात यावे असे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा कडून गोंदिया तालुका बुथ प्रमुख रविकुमार (बंटी) पटले यांच्या नेत्तृत्वात जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांना देण्यात आले.

सदर निवेदनाची प्रत खासदार प्रफुलभाई पटेल, पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम व माजी आमदार व जिल्हा नियोजन समिति सदर राजेंद्र जैन यांना देण्यात आलेली आहे. यावेळी करण टेकाम अध्यक्ष नेशनल आदिवासी पिपल्स फेडरेशन जिल्हा गोंदिया, राजेशकुमार तायवाडे पत्रकार राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष मिडिया प्रमुख गोंदिया तिरोडा विधानसभा क्षेत्र, रघुवीरसिंग उईके, आरिफ. पठान, लोकेश नागभीरे व धनलाल नागभीरे उपस्थित होते.



# लोकसभा निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासन 'इलेक्शन मोडवर'

## राष्ट्रीय कार्य म्हणून प्रत्येक कर्मचाऱ्याने दायित्व द्यावे, विभागाने मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावे

**गोंदिया :** आगामी निवडणुकांमध्ये जिल्ह्यातील मतदारांची संख्या वाढणे, निवडणुकांमध्ये अधिकाधिक पारदर्शिता, आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी, गतिशील कामे यासोबतच राष्ट्रीय कार्य म्हणून प्रत्येक कर्मचाऱ्यांनी आपले दायित्व पूर्ण करावे. जिल्ह्यात निवडणुकीच्या कामाची सुरुवात झाली आहे असे समजून सतर्क असावे, अशी सूचना जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी आयोजित बैठकीत केली.

भारत निवडणूक आयोगाकडून योग्य वेळी निवडणूक कार्यक्रम घोषित होईल. तत्पूर्वी, जिल्हा प्रशासनाने आजपासूनच इलेक्शन मोडमध्ये येऊन कामाला सुरुवात करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीला जिल्हाधिकाऱ्यांसोबत अपर जिल्हाधिकारी घनश्याम भुगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) भैय्यासाहेब बेहरे व सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

निवडणुकीच्या विविध विषयाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी निवडणूक विभागाने नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली असून आजच्या बैठकीत प्रत्येक नोडल अधिकाऱ्याला त्यांच्या कामाचा तपशील समजावून सांगण्यात आला. आदर्श आचारसंहिता, मनुष्यबळ व्यवस्थापन, प्रशिक्षण व्यवस्थापन, निवडणूक साहित्य व्यवस्थापन, परिवहन व्यवस्थापन, संगणकीय कार्य व सायबर सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था, निवडणूक खर्च, पोस्टल बॅलेट, माध्यम व पेड न्यूज, कम्युनिकेशन प्लान, मतदार यादी, निवडणूक निरीक्षक यांचे नोडल अधिकारी, दिव्यांग मतदार नोडल अधिकारी, सुरक्षा अधिकारी व्यवस्था, मतदार हेल्पलाईन, तक्रार निवारण, मतदार जनजागृती आणि ईव्हीएम व्यवस्थापन असे निवडणूक संबधी कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक अधिकाऱ्याने आपली जबाबदारी समजून घेऊन ती योग्यरित्या पार पाडावी असे आवाहन त्यांनी केले.



निवडणूक काळात नागरिकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी निवडणुका संदर्भात वेगवेगळ्या समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. या समित्यांचे सर्व विभाग प्रमुख यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी यांनी या बैठकीत विभागवार आढावा घेतला. निवडणुकीसाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी त्या त्या विभागाची असणार आहे. ज्या विभागाकडून मनुष्यबळ उपलब्ध झाले नाही त्यांनी तात्काळ मनुष्यबळ कळविण्याचे स्पष्ट करण्यात आले.

निवडणुकीच्या वेळेस नेमणुकांमध्ये बदल करणे, जागा बदलून मागणे, दिलेल्या जागेवर काम करण्यास असमर्थता दर्शविणे, आरोग्याचे वेगवेगळे कारण सांगणे, अशा प्रकारचे अनेक अर्ज कर्मचाऱ्यांकडून येत असतात. मात्र यामध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही. निवडणुकीचे कार्य हे राष्ट्रीय कार्य असून त्याकडे तेवढ्याच सकारात्मकरित्या कर्मचाऱ्यांनी बघावे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

मतदार जागृतीच्या संदर्भातील उपक्रमाचे प्रमुख यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना घोषित करण्यात आले, त्यांना सर्व विभागाने मदत करावी. यावर्षी जिल्ह्यामध्ये सर्व निवडणुकांमध्ये विक्रमी मतदान व्हावे व युवकांचे मतदान सर्वात अधिक असावे याकडेही त्यांनी यावेळी लक्ष वेधले. यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांना जिल्ह्यात सुरुवात झाली आहे. यामध्ये गती आणण्याचे आवाहनही त्यांनी केले.

निवडणुकांमध्ये मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. यासाठी युवकांनी पुढे यावे व आपल्या आजुबाजूच्या परिसरातील ज्या लोकांनी मतदार म्हणून नोंदणी केली नसेल किंवा नावे मतदार यादीमध्ये आली नसेल किंवा मृत झालेल्या नागरिकांची नावे कमी करायची असेल यासाठी निवडणूक विभागाला सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. आपल्या जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी प्रत्येक शिक्षित नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहनही त्यांनी केले.

# जिल्हास्तरीय पाणी गुणवत्ता प्रशिक्षण

**गोंदिया:** ग्रामीण जनतेला शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी जिल्हास्तरावर पाणी गुणवत्ता विषयक प्रशिक्षण अग्रेसन भवन येथे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आले.



या प्रशिक्षणात उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) गोविंद खामकर, प्रकल्प संचालक गोविंद पिंगळे, जलजीवन मिशनचे कार्यकारी अभियंता सुमित बेलपत्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण संजय गणवीर, प्राध्यापक रसायनशास्त्र डॉ. राजकुमार पटले, धोटे बंधू विज्ञान महाविद्यालयातील निशा रहांगडाले, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, तालुक्यातील गटविकास अधिकारी, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, सर्व विस्तार अधिकारी, उपविभागीय अभियंता, कनिष्ठ इंजिनिअर, प्रयोगशाळा कर्मचारी, जलजीवन मिशन संघ, धोटे बंधू विज्ञान महाविद्यालयातील एमएससी अभ्यासक्रमातील शिकाऊ विद्यार्थी उपस्थित होते. ग्रामीण जनता तसेच शाळा अंगणवाडी केंद्रातील मुलांना शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी जिल्हा पाणी गुणवत्ता तज्ज्ञ मुकेश त्रिपाठी यांनी केंद्र शासन राबवीत असलेल्या जलजीवन मिशनचे उद्देश, शासन निर्णय, धोरण, कर्तव्य व जबाबदारी आणि जिल्ह्याची पाणी पाणी गुणवत्तेची सद्यस्थिती याबाबत पावर पाईंट प्रेझेंटेशनद्वारे सखोल मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणात जैविक व रासायनिक फील्ड टेस्ट बाबत जिल्हा प्रयोगशाळेतील रसायनी सुनील गराडे व भारती पटले यांनी मार्गदर्शन केले. जलजन्य साथीचा उद्रेक होऊ नये करिता घ्यावयाची दक्षता बाबत साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल व साथरोग शास्त्रज्ञ डॉ. सुशांकी कापसे यांनी मार्गदर्शन केले. केंद्र शासनाच्या संकेतस्थळ नोंदी बाबत प्रदीप शरणागत,महेश पटले यांनी माहिती दिली. संचालन माहिती शिक्षण व संवाद तज्ज्ञ अतुल गजभिये यांनी केले.